४१ वा वर्धापन दिन

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर | बुधवार, ६ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २६८ । पाने १२+२४ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भारत-फिलिपाईन्समध्ये चार करारांवर स्वाक्षरी

## पंतप्रधान मोदी-राष्ट्राध्यक्ष मार्कोस यांच्यात बैठक | व्यापार, संरक्षण, तंत्रज्ञान, शिक्षण क्षेत्रात सहकार्य

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष फर्डिनांड आर. मार्कोस यांच्यात मंगळवारी झालेल्या बैठकीनंतर दोन्ही देशांत चार सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. या करारांचा उद्देश दोन्ही देशांमधील सहकार्य वाढवणे आणि परस्पर संबंध मजबूत करणे आहे. व्यापार, सुरक्षा, शिक्षण आणि तंत्रज्ञान यासारख्या क्षेत्रात भागीदारी वाढवण्याच्या दिशेने हे करार एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

फिलिपाईन्सचे राष्ट्राध्यक्ष मार्कोस भारतीय दौऱ्यावर आहेत. त्यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांची भेट घेतली. यावेळी मार्कोस यांचे स्वागत करण्यात आले. मोदी आणि मार्कोस यांच्या झालेल्या द्विपक्षीय बैठकीत सांस्कृतिक आणि संरक्षण क्षेत्रात सहकार्य, तसेच आंतरराष्ट्रीय मुद्यांवर चर्चा झाली. यावेळी मोदी म्हणाले की, भारत-फिलिपाईन्सच्या राजनैतिक संबंधाला ७५ वर्षे पूर्ण झाले असले तरी, दोन्ही देशांमधील सांस्कृतिक संबंध शतकानुशतके जुने आहे. फिलिपाईन्समधील रामायणातील महाराडिया लावना ही कथा याचे एक मोठे उदाहरण आहे. दोन्ही नेत्यांमधील चर्चेचा उद्देश मैत्री आणि परस्पर सहकार्य अधिक मजबूत करणे आहे.



**दोन्ही देशांतील संबंध मजबूत**

तंत्रज्ञान, व्यापार आणि अर्थव्यवस्थेचे स्वरूप बदलत आहे आणि सभोवतालच्या भूराजनीतीमुळे निर्माण झालेल्या संधीचा दोन्ही देशांना फायदा होईल. आगामी काळात भारत आणि फिलिपाईन्समधील संबंध दृढ होतील आणि अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात सहकार्य वाढेल, अशी अपेक्षा मोदी यांनी व्यक्त केली. यावेळी ऑपरेशन सिंदूरला पाठिंबा दिल्याबद्दल फिलिपाईन्सच्या राष्ट्राध्यक्षांचे मोदी आणि राष्ट्रपती मुर्मू यांनी आभार मानले. (वृत्तसंस्था)

### स्मारक टपाल तिकिटे जारी

एका विशेष कार्यक्रमादरम्यान दोन्ही नेत्यांनी संयुक्तपणे स्मारक टपाल तिकिटे जारी केली. ही टपाल तिकिटे भारत आणि फिलिपाईन्समधील मजबूत आणि ऐतिहासिक संबंधांचे चित्रण करतात. दोन्ही देशांमधील सांस्कृतिक आणि राजनैतिक संबंधांचे स्मरण करण्यासाठी हे तिकिटे जारी करण्यात आले.



उत्तराखंडातील नैनिताल येथील नैनिताल-हल्दवानी मार्गावर दरड कोसळली. येथील मलबा हटवून रस्ता मोकळा करताना जेसीबी

## गुगल सर्चमुळे महिलेची झाली कुटुंबीयांशी भेट

◆ **ठाणे, ५ ऑगस्ट**

गेल्या दीड वर्षापासून बेपत्ता असलेली मूळची कर्नाटकातील मनोरुग्ण महिलेची गुगल सर्च आणि महाराष्ट्रातील एका सामाजिक संस्थेच्या प्रयत्नांमुळे तिच्या कुटुंबाशी पुन्हा भेट झाली. कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्ह्यातील कारवार येथील रहिवासी ही महिला ५ फेब्रुवारी २०२४ रोजी दक्षिण गोवा जिल्ह्यातील वेर्ना पोलिस स्टेशन हद्दीतील एका परिसरात दयनीय अवस्थेत आढळली होती.

यानंतर तिला महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ तालुक्यातील पांडूर गावातील जीवन आनंद संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या सविता आश्रमात आणण्यात आले, असे संस्थेने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. आश्रमात तिला काळजीवाहकांच्या पथकाकडून वैद्यकीय उपचार, समुपदेशन आणि भावनिक आधार मिळाला. हळूहळू तिचे मानसिक आरोग्य सुधारले आणि तिला तिच्या ओळखीचे काही तुकडे आठवू लागले. यात तिला गावाचे नावही आठवले. त्यानंतर आश्रमाचे विश्वस्त किसन चौरे यांनी तिची मुळे शोधण्यासाठी गुगल सर्चचा वापर केला. त्यांना तिचे कुटुंब जिथे राहत होते ते ठिकाण शोधण्यात यश मिळाले. त्यांनी कारवार शहर पोलिस ठाण्याशी संपर्क साधला आणि तिच्याबाबत माहिती दिली. (वृत्तसंस्था)

# भाजपा नेते शुवेंदू अधिकारी यांच्या ताफ्यावर हल्ला

## वाहनांची तोडफोड

◆ **कोलकाता, ५ ऑगस्ट**

पश्चिम बंगालमध्ये भाजपा नेते शुवेंदू अधिकारी यांच्या ताफ्यावर हल्ला झाला. काही लोकांनी त्यांच्या वाहनावर दगडफेक केली.

ही घटना मंगळवारी सकाळी घडली, जेव्हा शुवेंदू अधिकारी पश्चिम बंगालच्या कूच बिहारमध्ये एका रॅलीचे नेतृत्व करीत होते. त्याचवेळी काही लोकांनी त्यांच्या ताफ्याला लक्ष्य केले. शुवेंदू अधिकारी यांच्या निदर्शन रॅलीच्या प्रत्युत्तरादाखल ममता बॅनर्जीचा पक्ष तृणमूल काँग्रेसनेही परिसरात निदर्शने करण्याची योजना बनवली होती.

शुवेंदू अधिकारी यांच्या वाहनांची तोडफोड केल्याच्या घटनेचा व्हिडीओ समोर येताच सर्वत्र खळबळ माजली. हल्लेखोरांनी पोलिसांच्या गाडीच्या काचा फोडल्या. शुवेंदू यांच्या ताफ्यातील सर्वच वाहनांना लक्ष्य करण्यात आले. सोबतच अधिकारी यांना काळे झेंडेही दाखवण्यात आले. घटनास्थळी अनेक लोक तृणमूलचा झेंडा हाती घेऊन नारेबाजी करताना दिसत होते.

घटनेनंतर शुवेंदू अधिकारी यांनी ताबडतोबत आपल्या कार्यकर्त्यांसह पोलिस आयुक्तालय गाठले. तेथे त्यांनी घटनेची तक्रार नोंदवली. (वृत्तसंस्था)

# खरा भारतीय कोण न्यायमूर्ती ठरवू शकत नाही?

## ● प्रियांका वढेरा बरळल्या ● न्यायालयावर अविश्वास

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

चीनने भारताची दोन हजार चौरस किमी जमीन बळकावली अशी टिप्पणी करणाऱ्या राहुल गांधी यांची सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दांत कानउघाडणी केली. यावर खरा भारतीय कोण हे ठरविण्याचा अधिकार न्यायमूर्तींना नसल्याचे काँग्रेस नेत्या प्रियांका वढेरा बरळल्या असून, त्यांनी या माध्यमातून न्यायालयावर अविश्वास व्यक्त केला.



तुम्ही खरे भारतीय असता, तर असे बोलला नसता, अशा कठोर शब्दांत न्यायमूर्तींनी राहुल गांधी यांना सोमवारी फटकारले होते. यावर प्रसार माध्यमांशी बोलताना प्रियांका म्हणाल्या, राहुल यांना भारतीय सैन्याबद्दल सर्वांत जास्त आदर आणि सन्मान आहे. लोकसभेचे विरोधी पक्ष म्हणून त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. डिसेंबर २०२२ मध्ये भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल यांनी लष्करावर केलेल्या टिप्पणीसंदर्भात न्यायामूर्तींनी घेतलेल्या आक्षेपावर विचारले असता, त्या म्हणाल्या, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भारतीय कोण हे ठरवू शकत नाही, किंबहुना त्यांना तो अधिकार नाही.

प्रश्न विचारणाऱ्यांना देशद्रोही ठरविले जाते, तेव्हा न्यायालय यावर मौन राहते. राहुल खरे भारतीय असून, ते सरकारला प्रश्न विचारतच राहतील. गलवानच्या घटनेपासून प्रत्येक भारतीयाला देशाच्या सुरक्षेसंदर्भात अनेक प्रश्न पडले आहे आणि सरकार याचा तपशील देणे टाळत असल्याचे त्यांना सांगितले. (वृत्तसंस्था)

### काय आहे प्रकरण?

राहुल गांधींनी ९ डिसेंबर २०२२ रोजी भारत जोडो यात्रेदरम्यान केलेल्या भाषणात सैन्याशी संबंधित टिप्पणी केली होती. त्यांच्याविरोधात लखनौ न्यायालयात खटला दाखल करण्यात आला. न्यायालयीन कार्यवाहीला स्थगिती देताना न्यायालयाने खरे भारतीय असतील, तर त्यांनी चीनने भारतीय भूभाग बळकावला अशी टिप्पणी करायला नको होती असे सुनावले होते. यावर प्रियांका यांनी राहुल यांच्या टिप्पणीचे चुकीचे वर्णन केल्याचे म्हटले आहे. भाजपाने राहुल गांधींवर चीनला पाठिंबा देण्याचा आरोप केला आणि त्यांची वृत्ती राष्ट्रविरोधी असल्याचे म्हटले आहे



जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० आणि ३५-ए हटवून मंगळवारी सहा वर्षे झाली. या निमित्त श्रीनगर येथे सुरक्षा व्यवस्था अशी चोख ठेवण्यात आली होती

# अमित शाहांचे गृहमंत्री म्हणून २,२५८ दिवस

## ● नवा विक्रम प्रस्थापित ● अडवाणींनाही टाकले मागे

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी एक नवा विक्रम आपल्या नावे नोंदवला आहे. ते गृहमंत्रिपदावर सर्वाधिक काळ राहणारे नेते बनले आहेत. सोबतच त्यांनी याबाबतीत भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचाही विक्रम मोडला आहे.

विशेष म्हणजे, ५ ऑगस्टलाच ही उपलब्धी त्यांच्या नावे नोंदवली गेली आहे. याच दिवशी त्यांनी संसदेत जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० संपुष्टात आल्याची घोषणा केली होती.

अमित शाह गृहमंत्रिपदावर २,२५८ दिवसांपासून आहेत. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात ३० मे २०१९ रोजी हे पद पहिल्यांदा स्वीकारले होते. त्यानंतर २०२४ मध्ये एनडीए सरकार स्थापन झाल्यानंतरही ते याच पदावर आसीन झाले. या पदावर अडवाणी यांच्यानंतर काँग्रेसचे दिग्गज नेते गोविंद वल्लभ पंत सर्वाधिक काळ राहिले होते.

एकीकडे अडवाणी यांनी एकूण २,२५६ दिवसपर्यंत गृहमंत्री म्हणून सेवा दिली तिथेच पंत सहा वर्षे ५६ दिवस गृहमंत्री राहिले. विशेष म्हणजे, अमित शाह देशाचे पहिले सहकार मंत्रीही आहेत. यापूर्वी ते गुजरातचे गृहमंत्रीही राहिले आहेत. अडवाणी हे कणखर गृहमंत्री समजले जायचे. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदींकडून प्रशंसा

मंगळवारी पंतप्रधान मोदी यांनी एनडीए खासदारांच्या बैठकीत गृहमंत्री अमित शाह यांची प्रशंसा केली. पंतप्रधान म्हणाले, आता ते सर्वाधिक काळ सेवा देणारे केंद्रीय गृहमंत्री बनले आहेत. ५ ऑगस्ट हा एक ऐतिहासिक दिवस आहे. कारण याच दिवशी जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यात आले होते. एनडीए सरकारने खऱ्या अर्थाने घटनेचे अनुसरण केले आहे.

## चित्रपट वार्ता

### तरुणाईचा लाडका 'सैयारा' दिवाळीत ओटीटीवर

**मुंबई** : एक गायक आणि गीतकार तरुणी यांची प्रेमकहाणी असणारा 'सैयारा' तरुणाईला विशेष पसंत पडला. त्यामुळे चित्रपटाने तिकीटबारीवर चांगलीच मजल मारली. अनपेक्षितरीत्या या चित्रपटाने जगभरात ४७८ कोटी रुपये कमावले आहेत. अहान आणि अनीतच्या अभिनयाचेही कौतुक होत आहे. असा हा 'सैयारा' येत्या दिवाळीपर्यंत ओटीटीवर येणार असल्याचे वृत्त आहे. सध्या हा चित्रपट थियेटरमध्ये चांगली कामगिरी करतो आहे. त्यामुळे लगेचच तो ओटीटीवर आणणे निर्मात्यांना परवडणारे नाही. दिवाळीपर्यंत तो नेटफ्लिक्सवर पाहता येईल.



### 'तारक मेहता'च्या कलाकारांना आली 'बिग बॉस'ची ऑफर

**मुंबई** : लोकप्रिय टेलिव्हिजन रिॲलिटी शो 'बिग बॉस'चा १९ वा सीझन २४ ऑगस्टपासून सुरू होत आहे. यासोबतच या शोमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांची नावेही सतत समोर येत आहेत. या सीझनमध्ये, 'तारक मेहता का उल्टा चष्मा' या शोमध्ये तारक मेहताची भूमिका साकारणारा शैलेश लोढा याला शो ऑफर करण्यात आला आहे. त्याच्याशिवाय, त्याच शोमध्ये रोशनसिंग सोधीची भूमिका साकारणाऱ्या गुरुचरणशीही निर्माते चर्चा करीत आहेत. स्पर्धकांव्यतिरिक्त, शोच्या फॉरमॅटशी संबंधित बातम्याही सतत येत आहेत. बिग बॉस टीमने शैलेश लोढा यांच्याशी संपर्क साधला आहे. मात्र, निर्मात्यांना अद्याप त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्याच्याशिवाय, निर्माते लोकप्रिय प्रभावशाली फैसल शेख उर्फ मिस्टर फैसू यांच्याशीही चर्चा करीत आहेत. शोमध्ये त्याचे येणे जवळजवळ निश्चित आहे.

# ढगांमध्ये आढळले विषारी धातू

◆ **नवी दिल्ली, ५ ऑगस्ट**

एकेकाळी हिमालयाचे पाणी सर्वांत शुद्ध असल्याचे मानण्यात येत होते. मात्र, आता हिमालयातील ढग विषारी जड धातू वाहून नेत आहेत. त्यामुळे कर्करोगाचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. विशेषत: लहान मुलांसाठी हे जास्त धोकादायक आहे. हिमालयातील ढग पश्चिम घाटावरील ढगांपेक्षा १.५ पट जास्त प्रदूषित असल्याचे एका नवीन अभ्यासात दिसून आले आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग अंतर्गत येणारी स्वायत्त संस्था असलेल्या बोस इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासात पश्चिम घाट आणि पूर्व हिमालयात पावसाळ्याच्या सुरुवातीच्या काळात पर्जन्यमान नसलेल्या ढगांमध्ये कॅडमियम, तांबे आणि जस्त यासारख्या विषारी धातूंचे लक्षणीय प्रमाण आढळले. या अभ्यासासाठी, शास्त्रज्ञांनी २०२२ मध्ये पश्चिम घाटातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्थेच्या छतावर आणि पूर्व हिमालयातील दार्जिलिंग येथील बोस इन्स्टिट्यूट कॅम्पसमध्ये जमा झालेल्या अवक्षेपण नसलेल्या कमी-स्तरीय ढगांमध्ये जड धातूंच्या रचनेचा अभ्यास केला. प्रौढांपेक्षा लहान मुलांना अशा विषारी धातूंचा धोका ३० टक्के जास्त असतो.

**जड धातूंच्या रचनेच्या अभ्यासातून झाले स्पष्ट**



# हिमालयाचे पाणी होतेय् दूषित

पूर्व हिमालयातील प्रदूषित ढगांमध्ये विषारी धातूंचे प्रमाण जास्त असल्याने ते श्वासाद्वारे आत शिरणे हा कर्करोगजन्य नसलेल्या आजारांचा सर्वांत संभाव्य मार्ग आहे, असे 'सायन्स ॲडव्हान्सेस' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात अधोरेखित करण्यात आले आहे.

पूर्व हिमालयातील प्रदूषित ढगांमध्ये श्वासोच्छवास घेणे हे आजारांचे मुख्य मार्ग म्हणून ओळखले जात आहेत. ढगांमध्ये मिसळलेल्या क्रोमियममुळे कर्करोगजन्य धोका वाढला आहे, असेही अभ्यासात आढळून आले आहे. या अभ्यासात प्रदेशातील ढगांमध्ये कॅडमियम, क्रोमियम, तांबे आणि जस्त यांचे वाढलेले प्रमाण डोंगराच्या पायथ्याशी वाहने आणि औद्योगिक उत्सर्जनाशी जोडले गेले आहे. (वृत्तसंस्था)

### तुलनेने भारतीय ढग कमी प्रदूषित

ढग जड धातूंसाठी वाहतूक माध्यम म्हणून काम करतात. ते श्वासोच्छवासाद्वारे, त्वचेच्या संपर्कात येऊन आणि उंचावरील भागात पावसाच्या पाण्याच्या सेवनाद्वारे शरीरात प्रवेश करू शकतात, असा इशारा त्यांनी दिला आहे. चिंताजनक निष्कर्ष असूनही, अभ्यासात असे म्हटले आहे की चीन, पाकिस्तान, इटली आणि अमेरिका यासारख्या देशांच्या तुलनेत भारतीय ढग तुलनेने कमी प्रदूषित आहेत.

## एसयूव्हीतून एटीएम पळवण्याचा प्रयत्न

◆ **छ. संभाजीनगर, ५ ऑगस्ट**

महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर शहरात चार चोरट्यांनी एसयूव्हीच्या मदतीने एटीएम फोडून ते पळून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांचा हा प्रयत्न अयशस्वी झाला आणि ते पळून गेले. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सांगितले.

देशातील सर्वांत मोठी भारतीय स्टेट बँकेच्या शाहनूरवाडी शाखेत असलेले एटीएम सोमवारी पहाटे ३ ते ४ वाजता पळवण्याचा प्रयत्न झाला. चार जण स्पोर्ट्स युटिलिटी व्हेईकलमध्ये आले आणि त्यांनी पिवळ्या बेल्टने एटीएम बांधून ते ओढण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आले नाही, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. चोरट्यांनी एटीएम केबिनमध्ये बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरेही खराब केले आणि स्क्रू ड्रायव्हरच्या मदतीने कॅश डिस्पेंसिंग मशीन उघडण्याचा प्रयत्न केला. (वृत्तसंस्था)

## रजनीकांतचा जावई मृणालच्या प्रेमात?



**मुंबई** : मराठमोळी अभिनेत्री मृणाल ठाकूरने हिंदी आणि दाक्षिणात्य सिनेसृष्टीत चांगला जम बसवला आहे. नुकताच तिचा 'सन ऑफ सरदार-२' प्रदर्शित झाला. याच्या प्रीमियरला रजनीकांतचा माजी जावई धनुषदेखील हजर झाला. त्यावेळी धनुष आणि मृणाल यांच्यातील जवळीक पाहून सर्वांच्या भुवया उंचावल्या. त्यांच्या वयातील अंतर मात्र विचार करायला लावणारे आहे. धनुष ४२ वर्षांचा असून, दोन मुलांचा बाप आहे. मृणाल ३३ वर्षांची आहे. दोघांनी आजवर एकाही सिनेमात एकत्र काम केलेले नाही. तरीही त्यांची गाढ मैत्री दिसते आहे. यावरून सध्या तरी त्यांना आपले प्रेम गुपितच राहावे, असे वाटत आहे. धनुषचा नुकताच ऐश्वर्यासोबत घटस्फोट झाला आहे.



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
४१ वा वर्धापन दिन
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



# सवा लाख उद्योजक तर, ५० हजार स्टार्टअप्सचे उद्दीष्ट

## महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता धोरण-२०२५ जाहीर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.५ ऑगस्ट:**

महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, २०२५ ला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणामुळे राज्यात येत्या पाच वर्षात १.२५ लाख उद्योजक घडतील आणि ५० हजार स्टार्टअप्सब सुरू होतील असे नियोजन आहे. यामुळे देशातील सर्वाधिक यामुळे राज्यात स्टार्टअप आणि



युनिकॉर्न्स राज्यात स्थापन होण्याबरोबरच रोजगार निर्मिती आणि नाविन्यता क्षेत्रात राज्याची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होईल.

यात शहरी व ग्रामीण भागांतील तसेच महिलांच्या आणि युवकांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना विशेष प्रोत्साहन दिले जाईल. महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप उद्योग आहेत. ३१ मे, २०२५पर्यंत राज्यातील स्टार्टअप उद्योगांची संख्या २९ हजार १४७ आहे. देशाच्या एकूण स्टार्टअपच्या संख्येत १८ टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. स्टार्टअप उद्योगांना अधिक प्रभावी परिसंस्था तयार करण्यासाठी कालसुसंगत नवीन धोरण आखण्यात आले आहे. या धोरणात नवोपक्रम, उद्योजक, गुंतवणुकदार यांच्यासाठी प्रभावी इकोसिस्टम विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. या धोरणातील एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे मुख्यमंत्र्यांचा महा-फंड, ज्यामध्ये ५०० कोटी रुपयांचा निधी असून, यामार्फत सुरुवातीच्या टप्प्यातील २५ हजार उद्योजकांना मार्गदर्शन, इन्क्युबेशन आणि आर्थिक मदत दिली जाणार आहे.

सुव्यवस्थित पायाभूत सुविधांसाठी राज्यभर खढख, पॉलिटेक्निक व शैक्षणिक संस्थांमध्ये मायक्रो इन्क्युबेटर उभारले जातील. तसेच, प्रत्येक प्रशासकीय विभागात प्रादेशिक नवप्रवर्तन आणि उद्योजकता हब्स स्थापन करण्यात येतील. हे हब अखं, डीपटेक, फिनटेक, मेडटेक, सायबर सुरक्षा आणि शाश्वतता यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करतील. महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी' या ३०० एकरावरील नगरीत स्टार्टअप्स, कॉर्पोरेट, शैक्षणिक संस्था आणि सरकार यांना एकत्र आणले जाईल. ही इनोव्हेशन सिटी संशोधन व नवप्रवर्तनाचा केंद्रबिंदू असेल. थेट शासन विभागांसोबत काम करू शकतील आणि त्यांना २५ लाखांपर्यंतच्या पायलट वर्क ऑर्डर्स दिल्या जातील. तसेच, पेटंट नोंदणी, उत्पादन गुणवत्ता प्रमाणपत्रे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभाग यासाठी आर्थिक भरपाई दिली जाईल. तसेच सार्वजनिक संस्था व इतर विश्वासार्ह ग्राहकांकडून वर्क ऑर्डर्स प्राप्त झालेल्या स्टार्टअप्सना कर्ज सहाय्यासाठी खास यंत्रणा निर्माण केली जाईल.

परिवहन महामंडळ

# जमिनींच्या भाडेपट्टा करार कालावधीत वाढ

- ६० वर्षांऐवजी ४९ वर्षांचे दोन टप्प्यात ९८ वर्षांचा करार

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ ऑगस्ट:**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर करण्याच्या सुधारित धोरणास मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या धोरणानुसार महामंडळाच्या जमिनींच्या भाडेपट्टा कराराचा कालावधी आता ६० वर्षांऐवजी ४९ वर्षांच्या दोन टप्प्यात मिळून ९८ वर्षे करण्यास मंजुरी देण्यात आली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या कालावधी वाढीमुळे महामंडळाच्या प्रस्तावित प्रकल्पांच्या विकासाला गती लाभणार आहे. बसस्थानके, बस आगार, तसेच महानगरांसह, अन्य नागरी भागात प्रवाशांसह, विविध घटकांना चांगल्या सुविधा पुरविता येणार आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर उपयोग करण्याकरिता यापुर्वी २००१ मध्ये भाडेकराराचा कालावधी ३० वर्षे होता. त्यानुसार महामंडळाने २०१६ पर्यंत राज्यात असे ४५ प्रकल्प बांधा, वापरा व हस्तांतरित करा या धोरणानुसार राबविले. याच धोरणानुसार राज्यात १३ ठिकाणी आधुनिक बसतळ उभारणे प्रस्तावित होते. पण त्याला अल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे २०२४ मध्ये नवे धोरण आखण्यात आले. या धोरणात भाडेपट्टा कराराचा कालावधी ३० वर्षांवरून ६० वर्षे करण्यात आला. हे धोरण तयार करतानाच विविध महामंडळ आणि प्राधिकरणांकडील भाडेपट्टा करारांचा कालावधी ९९ वर्षे असल्याचे तज्ज्ञांच्या समितीने लक्षात आणून दिले होते.

# उत्तराखंडमधील धराली येथे ढगफुटी, अख्खे गाव गाडले गेले

**उत्तराखंड, दि.५ ऑगस्ट:**

३४ सेकंदात घरे आणि हॉटेल ढिगाऱ्यात गाडली गेली; उत्तराखंडमधील धराली येथे ढगफुटीमुळे खीर गंगा गाव वाहून गेले आहे. मंगळवारी दुपारी १.४५ वाजता ही घटना घडली. या घटनेचे अनेक व्हिडिओ आणि फोटो समोर आले आहेत. त्यात असे दिसून येते की डोंगरावरून पावसाचे पाणी आणि ढिगारा येऊन ३४ सेकंदात संपूर्ण गाव वाहून गेले.



उत्तरकाशीचे डीएम प्रशांत आर्य म्हणाले की, आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला आहे. ५० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. धराली गाव डेहराडूनपासून २१८ किमी अंतरावर आहे. घटनेचे अनेक व्हिडिओ आणि फोटो समोर आले आहेत. लष्करासह एसडीआरएफ, एनडीआरएफच्या बचाव पथकेही घटनास्थळी पोहोचली आहेत.

पूर गावाकडे येताच लोक ओरडू लागले. अनेक हॉटेलमध्ये पाणी आणि ढिगारा शिरला आहे. धराली बाजारपेठ पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. अनेक हॉटेल आणि दुकाने कोसळली आहेत. गेल्या २ दिवसांपासून येथे मुसळधार पाऊस पडत आहे. मुख्यमंत्री धामी म्हणाले की, आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. मान्सूनच्या पावसामुळे उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. मुंगेर, बक्सर, पूर्णिया, भोजपूर, पटना यासह बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये शेकडो गावे पाण्याखाली गेली आहेत. बिहारमधील पूर्णियामध्ये ३८ वर्षांनंतर विक्रमी पाऊस पडला. रविवार ते सोमवार या काळात येथे २७०.६ मिमी पाऊस पडला. यापूर्वी १९८७ मध्ये २९४.९ मिमी पाऊस पडला होता.

उत्तर प्रदेशात, प्रयागराज, वाराणसीसह १७ जिल्ह्यांमधील ४०२ गावे पुराच्या विळख्यात सापडली आहेत. आतापर्यंत पावसामुळे ३४३ घरे कोसळली आहेत. गेल्या २४ तासांत पूर-पावसाशी संबंधित अपघातांमध्ये १६ जणांचा मृत्यू झाला आहे. जौनपूर, चंदौली, सुलतानपूर, कानपूर, पिलीभीत आणि सोनभद्र येथे ५ ऑगस्टपर्यंत, वाराणसी, हमीरपूर आणि लखीमपूर येथे ६ ऑगस्टपर्यंत, तर प्रयागराज आणि मिर्झापूरमध्ये ७ ऑगस्टपर्यंत शाळांच्या सुट्ट्या वाढविण्यात आल्या आहेत.

# तळसंगीत दीड लाखांचे दागिने लंपास

**मंगळवेढा दि.५ ऑगस्ट:**

तळसंगी येथे मोटर सायकलवर आलेल्या एक अनोळखी पुरुष व एक अनोळखी स्त्री यांनी घरातील डब्यात ठेवलेले सोन्याचे गंठण व सोन्याची बोरमाळ असा एकूण १ लाख ४० हजाराचा मुद्देमाल चोरुन नेला असल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात दोघाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान मंगळवेढ्यात आत्तापर्यंत एक ही चोरटा पोलीसांना सापडत नसल्यामुळे पोलीसांच्या कर्तव्यावरच नागरिक सशंय व्यक्त करीत आहेत. फिर्यादी लक्ष्मी दगडू मेटकरी (वय ६०,रा.तळसंगी) या दि.५ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता घरी एकटी असताना घराच्या समोर मोटर सायकलवर एक इसम व एक महिला येवून हाक मारल्याने फिर्यादी हे घराच्या बाहेर आल्यावर त्या अज्ञात महिलेने धान्य व थोडे पैसे द्या असे म्हणाल्याने फिर्यादी ही स्वयंपाक खोलीत ठेवलेल्या डब्यातील ५० रुपये काढून त्यांना दिले. याच डब्यामध्ये एक तोळा वजनाचे सोन्याचे गंठण व एक तोळा सोन्याची बोरमाळ असा १ लाख ४० हजार रुपयाचा मुद्देमाल त्या डब्यात होता.

# महादेवी हत्तीणीला परत आणण्यासाठी मुख्यमंत्र्यांचा पुढाकार

## राज्य शासनही सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करणार

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ५ ऑगस्ट:**

नांदणी मठातील (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) माधुरी हत्तीण पुन्हा नांदणीत यावी, ही जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठाने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी. राज्य शासनही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून हत्तीणीला परत देण्यासंदर्भात भूमिका मांडेल, असे सांगून याप्रकरणी राज्य शासन पूर्णपणे मठाच्या पाठीशी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

नांदणी मठातील महादेवी हत्तीणी वनतारा मध्ये पाठविण्यात आल्याने कोल्हापूरातील नागरिकांच्यातून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.तिला परत आणण्याच्या मागणीसाठी रविवारी भव्य मोर्चा काढण्यात आला होता. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात बैठक घेण्यात आली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी राज्य शासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य



मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह नांदणी मठाचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मठाच्या परंपरा आणि स्थानिक जनतेच्या भावनांचा विचार करून कायदेशीर प्रक्रिया मार्गाने महादेवी हत्तीणीला पुन्हा मठात परत आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगून फडणवीस म्हणाले की, गेल्या ३४ वर्षांपासून माधुरी हत्तीण नांदणी मठात आहे. माधुरी पुन्हा मठात यावी ही जन भावना आहे. ही जन भावना लक्षात घेऊन राज्य शासन पुनर्विचार याचिका दाखल करेल. मठानेही आपल्या याचिकेमध्ये राज्य शासनाचाही समावेश करावा. तसेच वन विभागाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात स्वतंत्र सविस्तर भूमिका मांडण्यात येईल. यामध्ये केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाच्या निकषाप्रमाणे व उच्चस्तरीय समितीने सुचविलेल्या सर्व मुद्द्यांचे निराकरण करण्यात येईल. हत्तीणीची निगा राखण्यासाठी डॉक्टरसह राज्य शासन एक पथक तयार करून आवश्यक ती सर्व मदत करेल. आवश्यक वाटल्यास रेस्क्यू सेंटरसारखी व्यवस्थाही करण्यात येईल व त्या प्रमाणे सुविधा देण्यात येतील आदी बाबींचा समावेश करून या बाबी तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयास स्वतंत्र समिती नेमण्याची विनंतीही राज्य शासनामार्फत या याचिकेमध्ये करण्यात येईल, .

तसेच या प्रकरणात नागरिकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील जे हत्ती बाहेर नेण्यात आले, अशा सर्व हत्तींची माहिती वन विभागाने गोळा करावी, असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. यावेळी उपस्थित लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन माधुरी हत्तीणीला परत आणण्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घ्यावा, अशी भूमिका मांडली. आ.विश्वजीत कदम, सतेज पाटील, माजी खासदार राजू शेट्टी, ३खासदार धैर्यशील माने, खासदार विशाल पाटील, आमदार सर्वश्री आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर, अशोक माने, सदा खोत, राहुल आवाडे, अमल महाडिक, , माजी आमदार प्रकाश आवाडे, नांदणी मठाचे पूज्य स्वस्तीश्री जिनसेन महास्वामीजी, जैन अल्पसंख्याक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्य जीव) श्रीनिवास राव, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे आदीसह जैन स्वामी आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

# ४१ वर्षांची यशस्वी वाटचाल!

सोलापूर शहर-जिल्ह्यासह मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात वाचकांच्या पहिल्या पसंतीस उतरलेल्या प्रखर राष्ट्रीय विचारधारेच्या दैनिक तरुण भारतचा ४१वा वर्धापन दिन साजरा होत असल्याचा मनस्वी आनंद आहे. सोलापूरकरांच्या सहकार्याशिवाय हे कदापी शक्य नव्हते. लाखो वाचक, हजारो जाहिरातदारांच्या शुभेच्छांसह सोलापूर विकासाचा ध्यास घेवून १ ऑगस्टपासून दररोज तरुण भारतची 'विकसनशील सोलापूर' ही विशेष पुरवणी प्रसिध्द होत आहे. सोलापूर शहरासह जिल्ह्यातील ११ तालुक्यातील धार्मिकस्थळे, शक्तीस्थळे, गावांची वैशिष्ठ्ये, खाद्यसंस्कृती आणि पारंपरिक व्यवसाय, उद्योग, कृषी, मेडिकल हब, कला, क्रीडा, साािहत्य आदी विविध घटकांवर प्रकाशझोत टाकणारे विविध मान्यवर लेखकांचे दर्जेदार लेख तरुण भारतच्या विशेष पुरवणीत प्रसिध्द झालेत आणि होत आहेत. तरुण भारतच्या वर्धापन दिन विशेष पुरवणीस वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळत असल्याने वर्धापन दिनाचा आनंद द्विगुणित होत आहे.

सोलापूर तरुण भारतने गेल्या ४१ वर्षात सातत्याने राष्ट्रीय विचारांचा प्रसार करताना सोलापूरच्या विकासाचे ध्येय कायम जपले आहे. सोलापूरकरांच्या जिव्हाळ्याची उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनी पूर्ण करण्यासाठी, सोलापूरची विमानसेवा सुरु होण्यासाठी, सोलापूरच्या अर्धवट सिंचन योजना पूर्ण होण्यासाठी, सोलापूर शहरातून होणाऱ्या दोन उड्डाणपूलांचे काम सुरु होण्यासाठी, अवजड वाहनांमुळे शहरातील वाढलेल्या अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी बायपासच्या मागणीसाठी, सोलापूर स्मार्ट सिटीच्या माध्यमातून होणारी विकासाची कामे दर्जेदार होण्यासाठी, बोरामणी येथील आंतराष्ट्रीय विमानतळाचे रखडलेले काम पूर्ण होण्यासाठी, पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोटसह लगतचे तुळजापूर, गाणगापूर आदी तिर्थक्षेत्रांचे धार्मिक पर्यटन यशस्वी होण्यासाठी, सोलापूरकरांसाठी दैनंदिन पाणीपुरवठा आणि दररोजच्या समस्या निराकारणासाठी महापालिकेसह संबंधित सर्व यंत्रणांवर बातम्यांच्या माध्यमातून दबावतंत्र यासह सोलापूर शहर-जिल्ह्याच्या परिपूर्ण विकासासाठी सोलापूर तरुण भारतने सातत्याने पुढाकार घेत आपली लेखणी चालवलेली आहे. सोलापूर शहर-जिल्ह्याचा विकास व्हावयाचा झाल्यास आणि तोदेखील गतीने करावयाचा झाल्यास शासन-प्रशासनाबरोबरच स्थानिक लोकप्रतिनिधींची इच्छाशक्ती आणि पाठपुरावा करण्याची क्षमता जशी महत्वाची त्यापेक्षाही कित्येक पटीने अधीक सोलापूरकरांचा लोकसहभाग महत्वाचा आहे. सोलापूरच्या विकासासाठी शासन-प्रशासन आणि लोकप्रतिनिधी प्रयत्न करतीलच पण सोलापुरातील प्रत्येक नागरिकांनी सोलापूरसाठी खारुताईचा वाटा का होईना पण योगदान देणे गरजेचे आहे.



प्रशांत माने,
मुख्य संपादक
मो. ९८८११ ९१४४३

महापालिकेच्या घंटागाड्या आपल्या घरापर्यंत कचरा घेण्यासाठी येतात, त्यावेळी ओला व सुका कचरा वेगळा करून देणे, आपल्या घरातील कचरा उघड्यावर न टाकणे, नळाला पाणी आले की महापालिकेकडून पाणी बंद होईपर्यंत ते सांडणे आणि जीवनावश्यक अशा पाण्याची नासाडी करणे थांबविणे सोलापूरकरांचे प्रथम कर्तव्य आहे. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, शहरातून वाहन चालविताना नियमांचे पालन करणे, बांधकाम करताना नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणे, अतिक्रमण न करणे, रस्त्यावर अथवा फुटपाथवर बसून व्यवसाय न करणे या महत्वाच्या सूचनांचे जरी पालन झाले तरी प्रत्येक सोलापूरकरांनी आपले कर्तव्य पार पाडल्यासारखे होईल. कायम राजकीय नेते, लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणांना दोष देण्यापेक्षा स्वच्छ आणि सुंदर सोलापूर आणि सोलापूरचा विकास करण्यासाठी आपण आपला खारूताईचा वाटा उचलण्याची आज काळाची गरज आहे. बाकी सोलापूरकर सूज्ञ आहेत. दैनिक तरुण भारतवर आजपर्यंत आपण भरभरून प्रेम केलेले असून यापुढे देखील सोलापूरकर आणि तरूण भारत हे विश्वासाचं नातं अतूट राहिल, यात शंका नाही. **धन्यवाद.**

# 'स्थानिक' निवडणुकांचा बार दिवाळीनंतरच

**मुंबई, दि.५ ऑगस्ट:**

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक दिवाळीनंतर म्हणजे डिसेंबर किंवा जानेवारी महिन्यात होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी मंगळवारी दिली. विशेष म्हणजे या निवडणुकीत ईव्हीएमला जोडण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट मशीनचा वापर होणार नसल्याचेही त्यांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे विरोधी पक्षांनी यापूर्वी अनेकदा ईव्हीएम व व्हीव्हीपॅटमधील मतांची जुळवणी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आयोगाच्या व्हीव्हीपॅट न वापरण्याच्या निर्णयावर मोठा वाद होण्याची शक्यता आहे.

सोलापूर तरुण भारत

## आपले दैनिक..!

संस्कारांचा, संस्कृतीचा, जागर म्हणजे आपले दैनिक !
सद्विचार अन् नैतिकतेचा, सागर म्हणजे आपले दैनिक !
देशावरती, धर्मावरती, निस्सीम श्रद्धा, आपले दैनिक !
आदर्श आणिक व्यवहाराचा, संगम सुध्दा आपले दैनिक !

सवंगतेला, प्रलोभनांना, बळी न पडते आपले दैनिक !
सत्यासाठी निर्भयतेने, अविरत लढते आपले दैनिक !

राष्ट्रघातकी अविचाराला, निष्प्रभ करिते आपले दैनिक !
घनांधकारी दिवा लावते, दिशा दाविते, आपले दैनिक !

देशरक्षणा समरभूमीवर, जसा झुंजतो आपला सैनिक !
वैचारिक रणभूमीवरती, तसेच ठाके आपले दैनिक !

समाजातल्या सज्जनतेला, देत दिलासा आपले दैनिक !
सुजाण ऐशा प्रत्येकाला, खरेच वाटे' आपले ' दैनिक !

देवभक्तीचे देशभक्तीचे, तुम्ही घेतले असिधारा व्रत !
वाढदिनाच्या ह्याच शुभेच्छा, वर्धिष्णू हो तरुण भारत !

- मुकुंदराज पं. कुलकर्णी

सोलापूर तरुण भारत
Precision PRINTS
सस्नेह निमंत्रण
४१वा वर्धापन दिन...
सन्माननीय वाचक ______
सप्रेम नमस्कार,
गेली ४१ वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे. वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे. मराठवाडा, सोलापूर तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथेही तरुण भारतच्या माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत. अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्ने' कमर्शिअल प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा
॥ वर्धापन दिन ॥
आपले स्नेहांकित
सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड
श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक) | श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष) | श्री. प्रशांत माने (मुख्य संपादक)
संचालक मंडळ, तरुण भारत व प्रिसिजन प्रिंटस् परिवार
* स्थळ *
बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल, तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# अमेरिकेची डबल ढोलकी

आंतरराष्ट्रीय कूटनीतीमध्ये असे काही क्षण येतातच जेव्हा एखाद्या राष्ट्राला स्पष्ट रेषा आखून म्हणावे लागते - पुरे झाले...! आता आमचे आम्ही पाहून घेऊ!! भारतासाठी तो क्षण आला आहे आणि त्या क्षणी जसे वागले पाहिजे, तसेच भारत वागला आहे. अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवर मोठ्या प्रमाणात कर वाढवण्याच्या धमक्या दिल्या आणि कारण सांगितले की, भारताने रशियाकडून तेलाची आयात केली आहे आणि तो इतर देशांना हे तेल विकून नफादेखील कमावत आहे. हा आरोप म्हणजे अमेरिकेचे ढोंग आहे आणि ते भारताने उघडे पाडले आहे- पुराव्यासकट. युक्रेनमध्ये लोकांचे जीव जात असताना भारत रशियाकडून तेलाची आयात करीत असल्याचे सांगून भारताला खलनायकी प्रतिमेत अडकविण्याचा ट्रम्प यांचा डाव होता. तो त्यांच्याच अंगलट आला आहे. आकडेवारी जी कहाणी सांगते ती लक्षात घेतली पाहिजे. युद्धापूर्वी, रशियाचे तेल भारताच्या आयातीत जेमतेम २.५ टक्के होते. २०२३ पर्यंत हा आकडा जवळजवळ ३९ टक्क्यांपर्यंत वाढला आणि रशिया भारताचा मोठा पुरवठादार बनला. २०२४ मध्ये युरोपियन युनियन आणि रशिया यांच्यातील व्यापार हा भारत आणि रशिया यांच्यातील व्यापाराच्या तुलनेत तब्बल चौपट होता. युरोपही तेव्हा रशियाकडून तेल विकत घेतल्याबद्दल भारताला दोष देत होता. अमेरिकेचेही तेच. अमेरिका आपल्या अणुउद्योगासाठी रशियाकडून युरेनियम हेक्साफ्लोराईड, ईव्ही बॅटरीसाठी पॅलेडियम आणि विविध रसायने आणि खते आयात करीत असतो. मोती, मौल्यवान रस्ते, धातू, आयसोटोप्स, लाकूड व लाकडी फर्निचर, विमाने व सुटे भाग, पोलाद, तेलबिया, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणे, भाज्या इत्यादी अनेक वस्तू अमेरिका हा देश रशियाकडून आयात करतो. अमेरिकेसाठी रशियाकडून ही आयात केली जाते तेव्हा युक्रेनची ताकद कमी होत नाही आणि रशियाच्या युद्धखोरीला बळ मिळत नाही. भारताने काहीही केले तरी युक्रेनवर अन्याय होतो. अमेरिका स्वतःच्या पुरवठा साखळ्यांवर कधीही ताण येऊ देत नाही. परंतु जेव्हा १.४ अब्ज लोकसंख्या असलेला भारत पेट्रोल आणि डिझेलच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी परवडणारे कच्चे तेल विकत घेतो तेव्हा त्याच्यावर नफाखोरीचा आरोप अमेरिकेला करावासा वाटतो, यातच त्याचे ढोंग स्पष्ट होते. अमेरिकेची ही डबल ढोलकी भारताने उघडी पाडली आहे की, त्याबद्दल अधिक काही सांगण्याची गरजच नाही. यासंदर्भात एक साधा प्रश्न आहे की, अमेरिकेला त्यांचे नागरिक, तेथील उद्योग, तेथील रोजगार यांचे संरक्षण करण्याचा अधिकार असेल तर भारताने स्वतःच्या हितासाठी अशी आयात केली तर अमेरिकेच्या पोटात दुखण्याचे कारण काय? संपूर्ण जगाला नैतिकतेची शिकवण द्यायची आणि दुसरीकडे सतत अनैतिक वागायचे हे अमेरिकेचे जुनेच धोरण आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांत मात्र अशाप्रकारचा विचार करून सोबत किंवा विरोध करता येत नाही. त्यामुळे भारताकडून अमेरिकेशी जुळवून घेण्याचा प्रयत्न सतत होत आला. तरीही भारताला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यासाठी अमेरिका आसुसलेला असेल तर त्याचे मूळ अमेरिकेच्या हुकूमशाही स्वभावात आहे. आम्ही म्हणू तो लोकतांत्रिक आणि आम्ही सांगू तो हुकूमशहा, अशाच पद्धतीने अमेरिकेचे आंतरराष्ट्रीय राजकारण चालत आले. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्या त्याच परंपरेचा भाग आहेत. निर्बंध लादणे, आरोप करणे, शुल्क वाढविणे असे सारे अमेरिका सतत करीत असतो. ते त्या देशाने यापूर्वी चीनसोबत करून पाहिले. पण, चीन आणि भारत यांच्या अर्थव्यवस्थेत फरक आहे. ट्रम्प यांनी म्हटले म्हणून भारताची अर्थव्यवस्था मृतप्राय नाही. ती जिवंत, गतिशील आणि वर्धिष्णू अर्थव्यवस्था आहे. चीनची अर्थव्यवस्था सरकारकेंद्रित व सरकारच्या हुकूमावर चालणारी आहे. त्यामुळे तिकडे सरकारची गचांडी पकडली की उद्योगविश्व लायनीवर येते. तसे भारतात घडत नाही. घडणार नाही. याचे कारण भारतात औद्योगिक विश्वातदेखील लोकतांत्रिक व्यवस्था आहे. मोठ्या प्रमाणात वैविध्य आहे. सरकारवरील अवलंबित्व मर्यादित आहे. भारताची स्वतःचीच बाजारपेठ एवढी मोठी आहे की, त्याने ठरविले तर तो स्वबळावर उत्पादन व उपभोग दोन्हींचे व्यवस्थापन करू शकतो. परंतु, नव्या जागतिक व्यवस्थेत अर्थव्यवस्था एककल्ली किंवा देशकेंद्रित करून चालत नाही. त्यामुळे भारत संयमाने वाटचाल करीत असतो.

भारतीय वस्तूंवर वाढीव शुल्क लादण्याचा अमेरिकेचा पवित्रा हा एकप्रकारे अस्तित्वातच नसलेल्या समस्येचे भांडवल करून भारतीय अर्थकारणाला धक्का पोहोचविण्याचा डाव आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे रत्ने, दागिने, औषधी, वस्त्रोद्योग व आयटी सेवा यासारख्या क्षेत्रांना धक्का बसणार हे उघड आहे. पण, याउलट विचार केला तर भारत देखील अनेक वस्तू अमेरिकेकडून आयात करतो. अमेरिकेतील कंपन्यांच्या नजरेत भारत ही उत्तम क्रयशक्ती असलेली मोठी बाजारपेठ आहे. ट्रम्प यांच्यासारखीच पावले भारताने उचलली तर अमेरिकन उद्योगांचे काय होईल, याची कल्पना ट्रम्प यांना अद्याप आली नसावी. आधीच डॉलरचे आंतरराष्ट्रीय वर्चस्व कमी करण्यासाठी जगातील अनेक देशांनी कंबर कसलेली आहे. ब्रिक्स राष्ट्रे पर्यायी पेमेंट सिस्टमबद्दल उघडपणे बोलू लागली आहेत. पुरवठा साखळीचे वैविध्यीकरण हाही परवलीचा विषय बनलेला आहे. अशात भारतासारख्या महाकाय देशाला टार्गेट करणे ही ट्रम्प यांची मोठी चूक ठरणार आहे. खरे तर हा विषय डॉलरला पर्याय उभा करण्याच्या प्रयत्नांशीच संबंधित आहे. रशियाकडून तेल घेतले, ते विकले, नफा कमावला ही सारी अमेरिकेची बतावणी आहे. सर्वाधिक उपभोग, सर्वाधिक कार्बन उत्सर्जन, सर्वाधिक प्रदूषण यासाठी अमेरिका कुख्यात आहे. जोपर्यंत इतर देश अमेरिकेच्या धोरणाशी किंवा लहरींशी जुळवून घेतात, तोपर्यंत ते मित्र असतात. त्यापेक्षा वेगळे वागणारा देश लगेच शत्रूंच्या यादीत जातो. जगातील सर्वांत जुनी लोकशाही आणि सर्वांत मोठी लोकशाही हे अमेरिका आणि भारत या दोन देशांचे महत्त्व आहे. हे दोन देश एकत्र राहिले तर चीन किंवा रशिया यांच्याकडून जागतिक अर्थकारणाचा बचाव करण्याचे अर्धे काम आपसूकच होऊन जाते. अमेरिकेच्या लहरीपणामुळे भारताला आरसा दाखवण्याची भूमिका घ्यावी लागली. अमेरिकेने हे लक्षात ठेवले पाहिजे की, भारताची अर्थव्यवस्था आता दोन दशकांपूर्वी होती तेवढी निर्यातीवर अवलंबून राहिलेली नाही. देशांतर्गत बाजारपेठ वेगाने वाढली आहे. जगातील पर्यायी बाजारपेठा भारतासाठी आज पूर्वीपेक्षा जास्त सुलभ आहेत. भारत आता तसा अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अमेरिकेवर फारसा अवलंबून नाही. तरीही स्वायत्त राष्ट्र म्हणून एक भूमिका घेतल्याबद्दल भारताला दंडित करण्याची धमकी देण्याची आगळिक अमेरिकेने केलेली आहे. भारत आज टॅरिफच्या दबावामुळे झुकला तर अमेरिका हा मुद्दा दीर्घकाळ वापरेल. भविष्यातील कोणत्याही व्यापारी भागीदाराला नाव ठेवण्यासाठी अमेरिका हा मुद्दा वापरू शकेल. त्यामुळेच स्वतःच्या भूमिकेबद्दल ठाम राहण्याची भूमिका भारताने घेतली, हे योग्यच. यातला दुसरा मुद्दा असा की, व्यापारी वादांच्या स्थितीत सॉफ्ट पॉवरची भूमिका दुर्लक्षित केली जाते. सॉफ्ट पॉवर म्हणून भारताची जागतिक प्रतिमा फारच उज्ज्वल आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही, संस्कृती, तंत्रज्ञान आणि बौद्धिक भांडवलाचे केंद्र म्हणून भारताला मिळणारी सद्भावना अमेरिकेहून फार मोठी आहे. संगीत, चित्रपट, योग, पाककला, क्रिकेट, संशोधन, आयटी यासह बुद्धिबळासारख्या खेळात भारतीय क्रीडापटूंनी दाखविलेले कौशल्य जगाला भुरळ पाडणारे आहे. शिवाय, आंतरराष्ट्रीय वाटाघाटीत भारताचे एक सूत्र आहेः परस्पर आदर, परस्पर हित, परस्पर संवेदनशीलता. या सूत्रावर भारत भागीदारी करतो. तशी भागीदारी अमेरिका करीत नाही. भारत ते करतो म्हणून अमेरिकेचा त्रागा सुरू झालाय. अमेरिकेला भारताशी मैत्री कायम ठेवायची असेल तर त्याला समान दर्जा देण्याची दिलदारी दाखविली पाहिजे. भारताला प्यादा म्हणून वापरायचे असे अमेरिकेने ठरविले असेल तर ते कधीही शक्य होणार नाही. ट्रम्प यांनी कितीही डबल ढोलकी वाजविली तरी त्याचा काहीही फायदा होणार नाही.

## विशेष

# क्रीडा क्रांतीची पहाट

**प्रा. सुखदेव बखळे**

ज्या दिवशी भारतीय शिष्टमंडळाने २०३६ च्या ऑलिम्पिकसाठी तयारी करण्यासाठी लॉसने येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (आयओसी) च्या अधिकाऱ्यांची भेट घेतली, त्याच दिवशी मंत्रिमंडळाने राष्ट्रीय क्रीडा धोरणाला मान्यता दिली. त्याचा उद्देश २०३६ च्या खेळांसाठी भारतीय क्रीडा परिसंस्था तयार करणे हा आहे. हे धोरण प्रमुख क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून भारताला क्रीडा पर्यटन स्थळ बनवण्यावर लक्ष केंद्रित करते. देशाच्या क्रीडा परिदृश्याला आकार देण्यासाठी आणि क्रीडा माध्यमातून भारतीयांना सक्षम करण्यासाठी हा एक ऐतिहासिक उपक्रम आहे. नवीन क्रीडा धोरण सध्याचे राष्ट्रीय क्रीडा धोरण, २००१ ची जागा घेईल. हे धोरण भारताला जागतिक क्रीडा महासत्ता म्हणून स्थापित करण्यासाठी आणि २०३६ च्या ऑलिम्पिक खेळांसह आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये मजबूत दावेदार म्हणून स्थापित करण्यासाठी एक धोरणात्मक रोडमॅपच आहे. खेळाडूंना प्रशिक्षण आणि समर्थन देण्यासाठी जागतिक दर्जाची प्रणाली तयार करणे, राष्ट्रीय क्रीडा महासंघांची क्षमता आणि व्यवस्थापन वाढवणे, क्रीडा कामगिरी वाढवण्यासाठी क्रीडा विज्ञान, औषध आणि तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे, प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहायक कर्मचाऱ्यांसह क्रीडा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आणि विकसित करणे आदी उपक्रमांचा या धोरणात समावेश आहे. हे धोरण क्रीडा क्षेत्रातील आर्थिक क्षमतेवर भर देते आणि त्याचे उद्दिष्ट क्रीडा पर्यटनाला चालना देणे आणि भारतात प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे हे आहे.

सार्वजनिक-खाजगी भागीदारी, कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी आणि नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा उपक्रमांद्वारे खाजगी क्षेत्राच्या सहभागाला या धोरणात प्रोत्साहन देण्यात आले आहे. नवीन क्रीडा धोरण सामाजिक समावेशाला चालना देण्यासाठी खेळांच्या भूमिकेवर भर देणारे आहे. त्याचप्रमाणे विविध क्रीडा कार्यक्रमांद्वारे महिला, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, आदिवासी समुदाय आणि दिव्यांग व्यक्तीचा सहभाग वाढवण्यावर विशेष भर देणारे आहे. स्थानिक आणि पारंपरिक खेळांचे पुनरुज्जीवन आणि त्याला प्रोत्साहन देण्यावर या धोरणात भर आहे. खेळांना एक व्यवहार्य करीअर पर्याय म्हणून स्थापित करण्याबरोबच भारतीय समुदायाला क्रीडाविश्वात सामावून घेण्याचा उद्देश आहे. खेळाला राष्ट्रीय चळवळ बनवणे हे या क्रीडा धोरणाचे आणखी एक उद्दिष्ट आहे. देशव्यापी मोहिमा आणि समुदायआधारित कार्यक्रमांद्वारे खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग आणि फिटनेसबाबत जनजागृती करणे, शाळा, महाविद्यालये आणि कामाच्या ठिकाणी फिटनेसबबात निर्देशांक सादर करणे, क्रीडा सुविधांची सार्वत्रिक उपलब्धता



वाढवण्यावर मेहनत घेणेही त्यात अपेक्षित आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नव्या धोरणात काही प्रस्ताव ठेवण्यात आले आहेत. शालेय अभ्यासक्रमात खेळांचा समावेश करणे. क्रीडा शिक्षण आणि जागरूकता वाढवण्यासाठी शिक्षक आणि शारीरिक शिक्षण शिक्षकांना विशेष प्रशिक्षण देणे, यावर भर देण्यात आला आहे. नव्या क्रीडा धोरणातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कायदेशीर चौकटीसह क्रीडा प्रशासनासाठी एक मजबूत नियामक चौकट स्थापित करण्यात येणार आहे. खाजगी क्षेत्र निधी आणि समर्थन (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) अशा नावीन्यपूर्ण वित्तपुरवठा यंत्रणा विकसित करून 'पीपीपी' आणि 'सीएसआर'द्वारे खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्यात येणार आहे. कामगिरीचा मागोवा घेण्यासाठी, संशोधन करण्यासाठी आणि कार्यक्रम अंमलबजावणीसाठी 'एआय' आणि डेटा विश्लेषणासह अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर अधिक भर देण्यात येणार आहे. एनएसपी २०२५ मध्ये राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी एक मॉडेल म्हणून काम करणार आहे. ऑलिम्पिकमध्ये भारतीय क्रीडापटूंची कामगिरी हळहळू सुधारत आहे. क्रीडा जगतातील या सगळ्यात मोठ्या स्पोर्टिंग इव्हेंटमध्ये भारतीय क्रीडापटू पदक जिंकण्यात यशस्वी ठरू लागले आहेत. मूलभूत सोयी-सुविधांची कमतरता असूनही केवळ गुणवत्तेच्या जोरावर भारतीय क्रीडापटूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची मान अभिमानाने उंचावली आहे. आता भारताच्या नव्या क्रीडा धोरणाची जोड क्रीडापटूंना मिळणार आहे.

या धोरणामध्ये तळागाळातील क्रीडापटूंना पायाभूत सोयीसुविधा पुरवण्यावर भर देण्यात येईल. त्याचप्रमाणे क्रीडापटूंना आर्थिक पाठबळ देण्याचा मानसही आहे. क्रीडाक्षेत्रात मागील काही वर्षांमध्ये भारताने देदीप्यमान कामगिरी केली आहे. प्रतिकूल परिस्थितीत खेळाडूंनी धडे गिरवले आणि भारताचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर गाजवले. भारताने क्रिकेटशिवाय इतर खेळांमध्येही आंतरराष्ट्रीय पातळीवर झेंडा रोवला आहे. असे असताना भारताला क्रीडाक्षेत्रात आणखी भक्कमपणे पाय रोवण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलले आहे. नव्या क्रीडा धोरणात तळागाळातील क्रीडा स्पर्धांना भक्कम अधार देण्याचे उद्दिष्ट आहे. या माध्यमातून खेळाडूंची पारख केली जाणार आहे. तसेच त्यांना भविष्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. नव्या क्रीडा धोरणानुसार, ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा पायाभूत सुविधा अजून अत्याधुनिक करण्याचा मानस आहे. यामुळे खेळाडूंना स्थानिक पातळीवरच आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण मिळणार आहे. नवीन क्रीडा धोरणांतर्गत खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी क्रीडा विज्ञान आणि औषधांवर विशेष भर दिला जाईल. प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी आणि सहायक कर्मचाऱ्यांनाही चांगले शिक्षण दिले जाणार आहे.

नवीन क्रीडा धोरणानुसार भारतात आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यावर भर दिला जाणार आहे. या स्पर्धांमुळे भारतीय खेळाडूंचे मनोबल वाढेल. तसेच भारतीयांमध्ये खेळाप्रती रुची आणि आदर वाढेल. शाळांमध्येही खेळांचे महत्त्व आणखी वाढवले जाणार आहे. मुलांना शालेय जीवनापासूनच आंतरराष्ट्रीय पातळीवर करीअर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात क्रीडा सुविधा पुरवल्या जातील. खेळांना राष्ट्रीय चळवळ बनवण्याचा मुख्य उद्देश या धोरणामागे आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सक्षम पायाभूत सुविधा खेळाडूंच्या यशासाठी आवश्यक असतात. 'खेलो भारत नीती २०२५'अंतर्गत खेळाडूंची निवड आणि प्रगतीसाठी अत्याधुनिक डेटा विश्लेषण आणि क्रीडा विज्ञानाचा वापर केला जाईल. देशभरातून प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेण्यासाठी 'प्रतिभा ओळख कार्यक्रम' राबवला जाईल. त्यामुळे दुखापतींचे व्यवस्थापन, खेळाडूंचे मानसिक आरोग्य सांभाळणे आणि त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ शक्य होईल. क्रीडा पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या शहरांपुरता मर्यादित राहणार नाही. तळागाळापासून राष्ट्रीय स्तरापर्यंत सर्वसमावेशक आणि सुलभ क्रीडा पायाभूत सुविधा विकसित करण्याचे ध्येय आहे. त्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारीद्वारे जागतिक दर्जाची प्रशिक्षण केंद्रे व क्रीडांगणे उभारली जातील. त्यामुळे स्थानिक प्रतिभेला वाव मिळेल. दिव्यांग खेळाडूंच्या गरजा पूर्ण करण्यासाठी 'पॅरा स्पोर्ट्स'ला विशेष साहाय्य दिले जाणार आहे. भारताचा सांस्कृतिक वारसा आणि क्रीडा कौशल्ये जागतिक स्तरावर नेणे हे या धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. याखेरीज शाळेच्या अभ्यासक्रमात एक प्रमुख विषय म्हणून खेळ समाविष्ट केले जातील आणि लहानपणापासून क्रीडा साक्षरता रुजवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. या सर्व प्रयत्नांमधून देश क्रीडाक्षेत्रातील उज्ज्वल भवितव्याला गवसणी घालणार आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# छंद माझा वेगळा...

छंदातून ज्ञानवृद्धी होते. छंद माणसाला नवनवीन शिकायला देते. म्हणजेच काय तर छंद माणसाला जगायला शिकविते. पण छंद जोपासताना काही गोष्टींची पथ्ये पाळली जाणे गरजेचे आहे. आपल्या छंदाच्या नावाखाली होणारा अतिरेक बरेचदा अनेकांसाठी मनस्ताप ठरतो. त्रास होतो, पण बरेचदा बोलले जात नाही आणि मग छंदाच्या नावाखाली अवडंबर होतो. आज छंदाचा 'छांदिष्टवाडा' झाला आहे, असे म्हटले जाऊ शकते.

छंद या विषयावर लिहिण्याचे कारण एवढ्यासाठीच की, चार दिवसांपूर्वी एक प्रकार जिल्ह्यात उघडकीस आला आणि सर्वच अवाक् झाले. मी शासकीय अधिकारी आहे. माझ्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शासकीय वास्तूत मी काहीही करू शकतो, असा समज करून कदाचित जोपासलेला छंद आज एका अधिकाऱ्यासाठी चर्चेचा विषय झाला आहे. छंदातून ज्ञानवृत्ती होते. नवीन गोष्टी शिकायला मिळतात. सर्जनशीलता छंद जोपासण्यातून वाढते. सामाजिक संबंध वृद्धिंगत होण्यास छंदच पोषक ठरतात. स्वतःच्या आनंदासाठी नियमित करायला आवडणारे काम म्हणून छंदाची साधी सोपी व्याख्या केली जाऊ शकते. पण यासाठी काही बंधनंसुद्धा आहेत. छंद जोपासताना पुरेसा वेळ असणे, हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आता ज्या महाशयांच्या निमित्ताने छंद प्रपंच लिहावासा वाटला, ते एका प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यांनी केलं काय तर, आरोग्य केंद्र परिसरात कुक्कटपालन सुरू केलं. कोंबड्या पाळल्या, अंडी उबवण केंद्र उभारलं आणि हाच त्या महाशयांचा छंद



आहे. आता मान्यच आहे, त्यांना यातून आनंद मिळत असेल. पण छंद जोपासण्यासाठी पुरेसा वेळ असावा, या नियमाचे काय? आरोग्य क्षेत्रात काम करताना कायम सतर्क राहावे लागणाऱ्या या महाशयांना कोंबड्या पाळायला वेळ मिळत असेल तर रुग्णांची सेवा ते कधी करीत असावे? हा प्रश्नच आहे. कोंबड्यांचे संगोपन आणि रुग्णांकडे दुर्लक्ष हे वेगळे सांगण्याची गरज नाही. हा माझा छंद आहे, असे ते ठामपणे सांगतात. पण छंद जोपासायचा कुठे? याचे तारतम्य त्यांना आहे का? हा प्रश्न या निमित्ताने होतो. कोंबड्यांमुळे पसरणारी अस्वच्छता रुग्णांच्या आरोग्यासाठी धोक्याची घंटा ठरणार नाही, याची खात्री कोण देणार?

कोरोनापासून हा उपद्व्याप सुरू होता, जो आज उघड झाला. मग त्यांच्या वरिष्ठांना याची माहिती का नसावी? हेही मोठे कोडेच आहे. माहिती नसेल तर इतके वर्षांत त्यांनी कधीच या रुग्णालयाला भेट दिली नाही का? हाही प्रश्न निर्माण होते. असे नसेल तर या छंदात वरिष्ठांनाही आनंद मिळतो, असे म्हणायचे का? कुणाचे दुर्लक्ष, पाठिंबा कुणाचा हा विषय वेगळा ठेवला तरी खरंच शासकीय वास्तूत हे करण्याची परवानगी आहे का? प्रशासकीय व्यवस्थेच्या नियमावलीत हे सर्व बसते का? याचा विचार होणे गरजेचे आहे. या महाशयांचा हा छंद आज उजागर झाला म्हणून पण असे अनेक जण असतील जे आपले अनेक छंद जोपासत असतील, ज्याचे दुष्परिणाम प्रशासकीय यंत्रणेला भोगावे लागतात. अशांवर कदाचित कारवाई होईलही, पण कारवाईने मानसिकता बदलेल का हा प्रश्न आहे. जोपर्यंत मी करीत असलेले काम म्हणजे माझे कर्तव्य आहे. याची जाणीव होणार नाही, तोपर्यंत असे विचित्र छंद जोपासण्याची वृत्ती संपणार नाही? छंद जोपासलेच पाहिजे, पण ते सकारात्मक आणि तेही वास्तविकतेचा सारासार विचार करूनच! नाही तर छंद माझा वेगळा म्हणतात, कधी हेच छंद अंगलट येतील याचा नेम नाही? विशेषकरून प्रशासकीय व्यवस्थेत वावरताना हे पथ्य पाळलेच गेले पाहिजे.

आज प्रचंड मोठ्या आवाजात गाणे वाजवत रस्त्याने मिरवणुका काढण्याचाही लोकांना छंदच जडला आहे. आपल्या छंदामुळे कुणाला त्रास होतो, याचा विचार करण्याची क्षमता लोप पावली आहे. नियम आहेत. पण छंदापुढे नियमांचा विसर पडतो. छंद आनंद देतात, जीवनात सकारात्मकता आणतात, असे म्हणतात; मात्र अशा कृतींमधून केवळ तिरस्कार आणि द्वेषभावच निर्माण होऊ शकतो. छंदाला आपल्यापुरतेच मर्यादित ठेवा. ते इतरांवर लादण्याचा प्रयत्न करू नका. जेव्हा ही मानसिकता आमची होईल, तेव्हा शासकीय रुग्णालय परिसरात कोंबड्यांचे संगोपन करण्याची हिंमत होणार नाही!

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्री गीता : कर्मयोग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेचा तिसरा अध्याय कर्मयोग म्हणून परिचित आहे. या अध्यायात अर्जुन अधिकच गोंधळून गेला आहे. दुसऱ्या अध्यायात भगवान श्रीकृष्णाने संसार हे दुःखाचे मूळ असून त्यातून निवृत्तीचा सल्ला दिला आहे. ज्ञान हेच आत्मतत्त्वासाठी महत्त्वाचे असून मुक्तीसाठीचे ते सर्वयोग्य साधन म्हटले आहे. हे ऐकल्यानंतर अर्जुन बऱ्यापैकी ज्ञानगूढ गम्य झाला असताना भगवंत म्हणतात

**'तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय, युद्धाय कृतनिश्चयः'**

म्हणजे ज्ञानाच्या गाडीत बसण्याची तयारी सुरू असताना भगवंत म्हणतात, 'ऊठ! कर्म कर!' बरं! करावयाचे कर्म काही भोजन कर, अंघोळ कर, देवपूजा कर! असे नव्हते तर भगवान सांगतात 'युद्ध कर, तेही आप्तस्वकीयांशी!'

महाभयंकर कर्म; ज्यातून रक्तपात, कुलसंहार, महापाप ज्यायोगे नरकप्राप्तीचीच शक्यता अधिक आहे. अशा स्थितीत भगवंतांनी त्याला ज्ञान मार्गावर जाऊ द्यायला हवे होते, पण भगवंत त्याला 'कर्म कर' म्हणतात!

अर्जुन पार गोंधळून गेला आणि भगवंताला म्हणतो-

**'व्यामिश्रेणेव वाक्येन, बुद्धिम् मोहयसीव मे ।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयो हमाप्नुयाम् ।'**

भगवंता! परस्पर विरोधी विचारांनी तू माझ्या बुद्धीला मोहित करीत आहेस. कोणता तरी एक ठाम मार्ग मला सांग!

**'लोकेस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥'**

येथे भगवान त्याच्या शंकेचे निरसन करताना अर्जुनाला 'अनघ' म्हणतात. अनघ म्हणजे निर्मळ, निष्पाप, शुद्ध मनाचा. कारण अर्जुन पूर्ण समर्पित भावाने आपला झालेला गोंधळ मांडतात. म्हणून भगवंतही त्याला अनघ म्हणतात आणि विशद करतात की, अर्जुना, मी ज्ञानियांसाठी ज्ञानयोग आणि योगियांसाठी कर्मयोग सांगितला असून ते परस्परांना पूरक आहेत. पण मनुष्यमात्रात दोन प्रकारचे कर्ममार्गी आहेत. अधिकांश लोक कामना मनात ठेवून कर्म करतात. त्यांना कर्मफळाची कामना असते. काही मात्र कर्मफळाच्या उपभोगातून बाहेर पडून ब्रह्मजिज्ञासू बनतात. कर्मत्याग आणि कर्मशून्यता यामधील सम्यक मार्ग जिवासाठी मार्गसोपान असेल. कर्म तर करावेच लागते. कर्मत्यागाने मानवी उत्कर्ष होणे कठीण आहे. त्यासाठी कर्मयोगाचे अनुष्ठानच नैष्कर्म स्थितीपर्यंत नेते.

**'जे धावतया कर्माची लाणी, नैष्कर्म्य
बोधाची खाणी! जे भूकेलिया धनी, साधनाची!!'**

खरं तर आपण एक क्षणही कर्म केल्याशिवाय जगू शकत नाही. कारण आपण आपल्या निसर्गदत्त गुणांमुळे अगतिक आहोत. कर्मासाठी हतबलही आहोत.

**'नियतं कुरु कर्म त्वं,कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥'**

कर्म न केल्याने आपला शरीर व्यवहार शक्य नाही त्यामुळे कर्म न करण्यापेक्षा केव्हाही कर्म करणे निश्चित चांगले. पण हे कर्म करताना आसक्ती सोडून सतत कर्तव्यकर्म केले पाहिजे. तरच आपण परमात्म स्वरूप प्राप्त करू शकतो. यासाठी भगवान स्वतःचेच उदाहरण देतात.

**'न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिशू लोकेशू किंचन ।
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥'**

हे अर्जुन! जरी मला तिन्ही लोकात काहीही कर्तव्य नाही तसेच मला प्राप्त करण्यायोग्य कोणतीही वस्तू नाही तरीही मी निरंतर कर्म करीतच असतो. त्यातून भगवान कर्ममार्गाचे महत्त्व सांगतात. ते अर्जुनाला महत्त्वाचे तत्त्व सांगतात की, आपण करीत असलेली सर्व कर्मे प्रकृतीच्या गुणांनी केली जातात; पण आपण मूर्ख अहंकाराने मोहित होऊन 'मी'च कर्ता आहे असे समजतो. जर कर्ता करविता तो परब्रह्म परमात्मा आहे तर मी कशाला 'मी' आणि 'माझं' यात गुंतून राहतो. स्थूल देहाचा विचार केला तर आपल्याला इंद्रिय श्रेष्ठ वाटतात. इंद्रियाच्या पुढे मन श्रेष्ठ आहे आणि मनाच्या पुढे बुद्धी श्रेष्ठ आहे. पण बुद्धीच्याही पुढे आत्मा सर्वश्रेष्ठ आहे. ही विकासात्मक उकल समजली की, 'मी कर्ता' हा अहंगंड समूळ मिटेल.

भगवंत कर्मयोग सांगताना स्पष्टच सांगतात की, प्रजापती ब्रह्मदेवाने यज्ञासह प्रजा उत्पन्न केली आणि सर्वांना यज्ञकर्म हे उत्कर्षाचे साधन आहे हे स्पष्ट केले. म्हणून हे अर्जुना! यज्ञकर्म म्हणजे भगवद्कर्म असून ते सोडून अन्य कर्मात गुंतलेला मनुष्य कर्मबंधनात अडकतो. त्यामुळे यज्ञकर्म म्हणजे ईश्वराला अनुकूल कर्म तू कर!

**'कर्मे दासपणे करोनी निपूणे, नारायणा अर्पणे!' हे हवे कर्माप्रती भावसमर्पण.**

भगवान पुढे सांगतात-

**'अन्नाद्भवंति भुतानि पर्जन्याद्अन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥'**

सर्व प्राणिमात्र अन्नातून जन्माला येतात. अन्न पर्जन्यामुळे निर्माण होते. पर्जन्य यज्ञकर्मातून उत्पन्न होतो. हाच यज्ञ कर्मापासून निर्माण होतो. एका अर्थाने जीवसृष्टीचे हे विश्वचक्र आहे. विश्वचक्राचे कारक हे कर्मच आहे. म्हणून कर्म कर! त्यातही कोणत्याही फळाची अपेक्षा न करता; ईश्वराला समर्पित केलेले कर्म चित्त शुद्ध करते. शुद्ध चित्त जीवनमुक्तीचे साधन आहे. म्हणून निष्काम कर्म महत्त्वाचे आहे. कारण इंद्रियामध्ये विषय, विषयामध्ये रागद्वेष मुक्कामी असतात. ते मोक्षमार्गाचे अडथळे आहेत म्हणून त्यांच्या आहारी न जाता सद्भावनेने कर्म केले पाहिजे. हे पार्थ! जो पुरुष या सृष्टिचक्राचे अनुसरण करीत नाही तो इंद्रिय सुखात रत होऊन पापी बनतो आणि व्यर्थ जीवन जगतो. याच अध्यायात प्रसिद्ध असे भगवंताचे मत आहे.

**'मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीनिर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः ॥'**

हे अर्जुना! आता तू अध्यात्म बुद्धीने सर्व कर्मे माझ्यामध्ये समर्पण करून आशारहित, ममत्वरहित होऊन निश्चिंत मनाने युद्ध कर! तिसऱ्या अध्यायात भगवंताने ब्रह्मविद्या प्रतिपादित करतानाच कर्मयोग महिमा आणि कर्मयोगाचे प्रयोजन विशेषत्वाने स्पष्ट केले आहे. म्हणूनच तिसऱ्या अध्यायाला 'कर्मयोग' असे नामाभिधान केले आहे.

९८२२२६२७३५

### महाराष्ट्रातील आमदार-मंत्र्यांचा बेशिस्तपणा

महाराष्ट्राच्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आमदारांकडून अनेक गैरवर्तणुकीच्या बेशिस्त गोष्टी घडल्या. कुस्तीच्या आखाड्याप्रमाणे एकमेकांचे साथीदार घेऊन आमने-सामने जाणारे आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार जितेंद्र आव्हाड मैदानात उतरलेले सर्व जनतेला दिसले जणू काही एकमेकांची गँग यांची तयार असावी व एकमेकांवर हल्ला करावा इथपर्यंत यांची तयारी दिसली. टॉवेल आणि बनियनवर कँटिनमध्ये वावरणारे आणि वेटरला मारहाण करणारे आमदार संजय गायकवाड सर्व जनतेला दिसले. या आमदारांनी कोर्ट पेपर स्टॅम्पवर मरेपर्यंत एकमेकांना मारण्याचं आमंत्रण माजी खासदार इम्तियाज जलील यांना जाहीर दिले आहे म्हणजे हे आमदार कुठपर्यंत पोहोचलेले आहेत, हे दिसून येतं. या गोष्टी काही आमदारांच्या झाल्या, पण माणिकराव कोकाटेसारखे कॅबिनेट मंत्री मोबाईलवर अधिवेशन काळात रमी खेळत होते, हे कितपत योग्य आहे. हे कृषी मंत्री असूनही त्यांनी शेतकऱ्यांचा अनेक वेळा अपमान केला आहे. आता तर ते आपल्याच युती सरकारला भिकारी सरकार म्हणत आहेत. खरे म्हणजे यांचा धनंजय मुंडेंसारखा राजीनामा घ्यायला हवा होता. आज विधानसभेत एकमेकांच्या अंगावर जाणं, मारामाऱ्या करणं एवढे धाडस या आमदारांना झालेच कसे? हा खरा प्रश्न आहे.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

### इंग्लंडचा लाजिरवाणा पराभव

भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने धडक मोहीम राबवत बॅझबॉल टोळीला जेरबंद केले आहे. ओव्हल कसोटीत अंतिम दिवशी उर्वरित चार फलंदाजांना काबूत करत इंग्लिश कंपूचे आव्हान संपुष्टात आणले आहे. कसेही करून अँडरसन-तेंडुलकर चषक अपहरणाचा कट चाणाक्ष सिराजने उधळून लावला असून त्याबद्दल त्याला प्लेयर ऑफ दी मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. प्रचंड नाट्यमय आणि क्षणाक्षणाला उत्कंठा वाढवणाऱ्या ओव्हल कसोटीत सिराज आणि कंपनीने इंग्लंडचं वाटोळं केलं आहे. ओली सुकी जिंकणाऱ्या ओली पोपला मालिका जिंकण्यात अपयश आले असून बॅझबॉलला भारतीय संघाच्या यंग ब्रिगेडने २-२ असे थोपवले आहे. खरे तर या कसोटीत खेळपट्टीने दर दिवशी नवनवीन नखरे दाखवले. पहिले दोन दिवस लाजत, मुरडत ती गोलंदाजांच्या प्रेमात होती. तिच्या बाऊंस आणि सीम पुढे दोन्ही संघांचे नामचीन फलंदाज ताथा थैय्या करत होते. भारतीय संघाने धडपडत कसेबसे सव्वादोनशे गाठले तर इंग्लंडचा संघ अडीचशेत आटोपला. दुसऱ्या दिवशी खेळपट्टीच्या जरा जरा टच मी टच मी टच मी स्वभावाला सोळा फलंदाजांना नादी लागले. पण दुसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात खेळपट्टीने नमते घेतले आणि तिसऱ्या दिवशी तर कमालच केली. जणू काही पहिले दोन दिवस काही झालेच नाही या थाटात खेळपट्टी फलंदाजांवर मोहित झाली. आकाशदीप नावाचा टेलएंडर तिथे ६६ धावांचा आकाश दिवा लावून गेला. तिसरा दिवस गाजवला तो यशस्वी जैस्वालने. खेळपट्टी कशीही असो, प्रसंग कोणताही असो त्याचा सरळसोट फॉर्म्युला असतो, डर के आगे जीत है! त्याच्या बेधडक शतकाने भारतीय संघाने जवळपास चारशे धावांची मजल मारली. अर्थातच यात जडेजा, वॉशिंग्टन या अष्टपैलू जोडीच्या अर्धशतकी खेळींचा समावेश होता. विशेषतः वॉशिंग्टनने सुंदरने डावाच्या अखेरीस फलंदाजीत जो घणाघात केला, तोच शेवटी निर्णायक ठरला. मात्र सामन्यात अजूनही दोन दिवस बाकी असल्याने हा सामना बरोबरीत होता. वास्तविकतः ऋषभ पंत, बुमराह हे प्रमुख खेळाडू नसतानाही भारताने मिळवलेला विजय कौतुकास्पद आहे. संपूर्ण कसोटी मालिकेत भारतीय गोलंदाजीचे ओझे वाहणाऱ्या सिराजने २३ बळी घेत डॉनची भूमिका बजावली.

**अनिल पावशेकर**/९८२२९३९२८७

### भावांनो, लव्ह जिहादपासून आपल्या भगिनींना वाचवा

रक्षाबंधन हा श्रावण महिन्यातील महत्त्वाचा आणि भावा-बहिणीच्या प्रेमाच्या नात्याचा सण. बहीण-भावाच्या नात्याची, श्रीकृष्ण-द्रौपदी, ज्ञानेश्वर-मुक्ताई ही उदाहरणे आपल्याला माहीत आहेत. आजच्या काळातही बहीण-भावाचे नाते असेच असावे असे सर्वांनाच वाटते. पण सध्याची परिस्थिती बघता केवळ आपली बहीणच नाही, तर आपल्या सर्व भगिनी सुरक्षित असाव्यात, कुठल्याही व्यक्तीने तिला फसवून त्रास द्यायचा प्रयत्न करू नये असे प्रत्येक भावाला वाटले पाहिजे. मुलींना प्रेमाच्या खोट्या जाळ्यात अडकवून लग्न करणे, तिला त्रास देणे आणि नंतर तिची हत्या करणे असे प्रसंग वृत्तपत्रांमधून रोजच आपण वाचत असतो. कित्येक मुस्लिम तरुण आपले नाव बदलून हिंदू मुलींना आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढतात. लग्न करून त्यांना धर्मांतर करायला भाग पडतात. हे प्रेम नसून लव्ह जिहाद आहे. यातून आपल्याला काही सुख मिळणार नाही, प्रेम मिळणार नाही. फक्त बदनामी, मनस्ताप आणि यातनाच आपल्या वाट्याला येतात. आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्ती कशा आहेत हे आपल्याला समजायला हवे. त्यासाठी आता आपण भगवान श्रीकृष्णालाच बंधू म्हणून आपल्या रक्षणासाठी भक्तीची राखी बांधूया.

**रेवती मुकुंद भोपी**/खामगाव

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# समाचार चौकात महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची धडक कारवाई

■ लोखंडी खोके व पत्रा शेडचे अतिक्रमण काढले

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

शहरातील सोलापूर महानगरपालिकेच्या गवसू तांत्रिक पत्रानुसार महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने समाचार चौकातील लोखंडी खोके, पत्रा शेड व मुतारी असे अतिक्रमण काढण्यात आले.

सोलापूर शहरातील सार्वजनिक रस्त्यांवरील अतिक्रमण रोखण्यासाठी सोलापूर महापालिका सातत्याने कारवाई करत आहे. समाचार चौकातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे योजनेअंतर्गत ५० लाख रुपये खर्च करून समाचार चौक सुशोभीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी समाचार चौकातील सोलापूर महानगरपालिकेच्या नगर अभियंता गवसू तांत्रिक व महापालिका अतिक्रमण विभागाने संयुक्तपणे कारवाई करून अनधिकृत एक खोके , पत्राशेड सिमेंट कट्टा जेसीबीच्या साह्याने काढण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांच्या माध्यमातून पथकाने ही कारवाई केली.या मोहिमेत नगर अभियंता विभागातील हारून सिद्दीकी, अतिक्रमण विभागाकडील सुफीयान पठाण यांच्यासह कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.



सोलापूर महापालिका अतिक्रमण विभागाने यापूर्वीही व्यापाऱ्यांना आणि फेरीवाल्यांना अनधिकृतपणे जागा व्यापू नये, याबाबत सूचना दिल्या होत्या. मात्र, वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण हटवले जात नसल्यामुळे अखेर ही कारवाई करण्यात आली.सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने यापुढेही शहरातील प्रमुख रस्ते, चौक व गर्दीच्या भागात अतिक्रमणावर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तसेच नागरिकांनी सहकार्य करावे आणि सार्वजनिक मालमत्तेचा गैरवापर करू नये, असे आवाहन अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांनी केले आहे.

## महत्वाचे...



### महापालिकेच्या वतीने क्रांतीसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिकेच्या वतीने क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या कौन्सिल हॉल येथील आयुक्त कार्यालयात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गणेश बिराजदार,वीरेंद्र बिराजदार अशोक खडके आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

### कर्ज फेडण्यासाठी विवाहितेकडे ५० हजाराची मागणी

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

विवाहितेस लग्नात मानपान केला नाही तसेच झालेले कर्ज फेडण्यासाठी माहेरहून ५० हजार रुपये घेवून ये असे म्हणून दमदाटी व शिवीगाळ करीत छळ केला. याप्रकरणी पतीसह सासरच्या तिघांवर सदर बझार पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत नूरजहा सर्फराज मुल्ला (वय २४ रा. १७ अन्सारी चौक,शास्त्री नगर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती सर्फराज मुल्ला, सासरे महिबूब, सासू सलीमा (सर्व रा. शामराव नगर, सहारा कॉलनी सोलापूर) अशी गुन्हा नोंद झालेल्यांची नावे आहेत. हा प्रकार ५ जानेवारी २०२२ ते १२ डिसेंबर २०२४ या कालावधीत नूरजहा ही सासरी नांदत असताना घडला. पोलिस हवालदार काळे पुढील तपास करीत आहेत.

**छळ केल्याप्रकरणी पतीसह तिघांवर गुन्हा दाखल**



# रस्त्यावर मिळालेले मोबाईल अन् एटीएम कार्ड पोलीसांकडे जमा

■ प्रामाणिक रिक्षाचालकाचे कौतुक

**बार्शी, दि.५ ऑगस्ट-**

दीपक लक्ष्मण विधाते व समीर शेख राजेंद्र मुळे (अध्यक्ष, रिक्षा संघटना, बार्शी) यांना बार्शी येथील मलिकार्जुन मंदिर परिसरात कंपनीचा मोबाईल फोन व त्यामध्ये एक एटीएम कार्ड सापडले. त्यांनी कोणतीही विलंब न करता सदर वस्तू बार्शी शहर पोलीस ठाण्यात जमा केल्या. पोलीस ठाण्याचे कर्मचारी घाडगे यांच्यामार्फत मोबाईल तपासणी करुन, मोबाईलचा मालक संतोष गायकवाड (रा. रिधोरे, ता. माढा) यांचा असल्याचे स्पष्ट झाले. त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले आणि मोबाईल व एटीएम कार्ड त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. या प्रामाणिक व जबाबदार वर्तनाबद्दल बार्शी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे व पोलीस ठाण्याच्या स्टाफने दोन्ही रिक्षाचालकांचे अभिनंदन केले. नागरिकांकडून या रिक्षाचालकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## सोलापुरात पावसाची हजेरी

**सोलापूर : शहरात मंगळवारी दुपारनंतर आश्लेषा नक्षत्राच्या पावसाने हजेरी लावल्यामुळे सकाळच्या उकाड्याने सोलापूकर सुखावले.**



## १५ ऑगस्टची लगबग

**सोलापूर : १५ ऑगस्टच्या निमित्ताने विविध शाळांमधून लागणारे ढोल ताशांच्या तयारीच्या कामात व्यस्त असलेले कारागीर.**

# पोक्सो आणि अपहरण करुन बलात्कारचा आरोप असलेल्या आरोपीचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

बार्शी शहर पोलिस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ४२६/२०२५ नुसार आरोपी ओंकार आपासाहेब कोळी, रा. मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव याच्यावर पोक्सो,अपहरण आणि बलत्काराच्या आरोपावरुन बीएनएस कलम-१३७ (२),६४(२),(ळ),(I) व पोक्सो कलम-४,६,८,१२ प्रमाणे गुन्हा दाखल होता.

सदर संशयित आरोपीच्यावतीने बार्शी येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही. के.मांडे यांच्या न्यायालयात ॲड. राहुल पाटील, ॲड. विवेक गजशिव यांच्यावतीने जामीन अर्ज दाखल केला होता. यावेळी आरोपीचे वकील यांनी जोरदार युक्तिवाद करुन आरोपींना खोट्या गुह्यात गोवले आहे. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीत तफावत आहे. फिर्यादीने खोट्या गुन्ह्यात आरोपीला नाहक त्रास देण्याच्या हेतूने गुंतविलेले असून सदरची फिर्याद ही खोटी असल्याचा युक्तिवाद आरोपीचे वकील यांनी केला. यावेळी आरोपींचे वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरत अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश व्ही.के.मांडे यांनी वर नमूद आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला. यावेळी आरोपींच्यावतीने ॲड.राहुल पाटील,ॲड.विवेक गजशिव, ॲड.राजकुमार गुंड, ॲड.श्रीराम काशीद यांनी काम पाहिले.

# एनटीपीसीच्या आवारात झाडाला गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि. ५ ऑगस्ट-**

होटगी परिसरातील एनटीपीसी प्रकल्प परिसरातील झाडाला गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केली. हा प्रकार सकाळी अकराच्या सुमारास उघडकीस आला.

राम सिद्राम कोळी (वय ३५, रा. होटगी स्टेशन सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. एनटीपीसी आवारात लक्ष्मी मंदिर आहे. त्याच भागात चिंचेचे झाड असून त्या झाडाच्या फांदीला ओढणीने गळफास घेतलेल्या अवस्थेत राम मंगळवारी सकाळी अकराच्या सुमारास आढळून आला. त्यास नातेवाईकांच्या मदतीने खाली उतरवून हवालदार चव्हाण यांनी दुपारी २.३० च्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पैशाच्या कारणावरून स्वत:ला ब्लेडने केले जखमी

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

राहते घरी पैशाच्या कारणावरून तरुणाने ब्लेडने मारून घेऊन स्वत:ला जखमी करून घेतले. हा प्रकार मंगळवारी दुपारी १ च्या सुमारास घडला.दिपक पांडुरंग सोनवणे (वय ३२, रा. पंचशील नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. दिपक हा मंगळवारी त्याच्या राहत्या घरात असताना, पैशाच्या कारणावरून झालेल्या चर्चेनंतर त्याने स्वत:ला ब्लेडने मारून डाव्या हाताला जखमा करून घेतल्या आहेत. दुपारी २.१० वाजता सागर सोनवणे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that My Old Name **Chetan Anil Solanki** has been changed to New Name **Chetan Anilkumar Solanki**
( At Post Karmala Taluka, Karmala, Dist. Solapur)
Kindly Note The Same
**Affidavit No.5071**
**Date.05/08/2025**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज क्र. ५५/२०२५
पुढील नेमलेली तारीख ३०/०९/२०२५
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब, यांचे कोर्टात**
**(मे. एच.यु.यु. पाटील कोर्ट)**

**श्री. श्रीराम गोविंद देशपांडे,**
वय - ५५ वर्षे, धंदा - वायरमन,
रा. ४१६/ब, कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

१) **सौ. अंजली सुधाकर जोशी,**
वय ६१ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. किरकसे वाडा, आचार्य गल्ली,
धाराशिव, ता., जि. धाराशिव
२) **सौ. स्वरुपा संजय कुलकर्णी,**
वय - ५४ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. ३१२, उत्तर कसबा, सोलापूर, ता., जि. सोलापूर
३) **सौ. आरती महेश भालेराव,**
वय - ४९ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. किरण निवास, डोणजा, ता. परंडा, जि. धाराशिव
४) **सौ. पद्मजा विवेक दिक्षीत,**
वय - ४९ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. काडादी चाळ, मु.पो. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर — **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार हा सामनेवाला नं. १ ते ४ यांचा सख्खा भाऊ आहे. अर्जदार व सामनेवाला नं. १ ते ४ यांच्या आई श्रीमती लिला गोविंद देशपांडे या दि. १५/१०/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. तसेच अर्जदार व सामनेवाला नं. १ ते ४ यांचे वडील श्री. गोविंद रंगनाथ देशपांडे हे बार्शी येथे दि. १४/१०/२०२४ रोजी मयत झाले आहेत. तद्पश्चात कै. लिला गोविंद देशपांडे व कै. गोविंद रंगनाथ देशपांडे यांचे अर्जदार व सामनेवाला क्र. १ व ४ हेच कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी कै. लिला गोविंद देशपांडे व कै. गोविंद रंगनाथ देशपांडे यांचे अर्जदार व सामनेवाला क्र. १ व ४ हे कायदेशीर वारस असलेबाबत मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर साहेब, बार्शी यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसांच्या आत किंवा पुढील नेमलेल्या ३०/०९/२०२५ या तारखेस न्यायालयात हजर राहून कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही, असे समजून सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. ०२/०८/२०२५.

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर, बार्शी**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर, बार्शी**

## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि.सोलापूर**
११३(अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ४१३००१

**कमला को-ऑप बँक लि. सोलापूर** - **अर्जदार**
१४/३०, गांधी नगर, कटारे कॉम्प्लेक्स
अक्कलकोट रोड, सोलापूर-४१३००६
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ११०७/२०२४-२५ | रु. १,१३,२४१/- | ३ | **कय्युम अ. रहेमान सौदागर,** रा.२८१, साखर पेठ, सोलापूर |
| | | | ४ | **अंबादास नागप्पा सुपे** रा. २१०/११, शनिवार पेठ, इक्बाल क्लबजवळ, सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार मंगळवार, दि. १९/०८/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०५/०८/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकास विशेषतः मौजे बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर व आसपासचे तालुक्यातील लोकास खालील सही करणारे आमचे अशिलातर्फे सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे बार्शी येथील प्लॉट्स -

**अ)** याचा सर्व्हे नं. ४२४/१ब, याचा जुना गट नं. ९३६/५, याचा नविन गट नं. ९४२/५ यामधील बिनशेती प्लॉट नं. २८ याचे क्षेत्रफळ २३४.५० चौ.मी. आहे. याचा बिनशेती आकार १५५ रु. ०० पैसे आहे. याचे मोजमाप पूर्व बाजू मी. १४.००, दक्षिण बाजू मी. १६.७५, पश्चिम बाजू मी. १४.०० व उत्तर बाजू मी. १६.७५ आहे. यासी चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. २७, दक्षिणेस - गट नं. ९४२/६, पश्चिमेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. २९ आहे. याचे पाणी व वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

**ब)** याचा सर्व्हे नं. ४२४/१ब, याचा जुना गट नं. ९३६/५, याचा नविन गट नं. ९४२/५ यामधील बिनशेती प्लॉट नं. २९ याचे क्षेत्रफळ २३४.५० चौ.मी. आहे. याचा बिनशेती आकार १५५ रु. ०० पैसे आहे. याचे मोजमाप पूर्व बाजू मी. १४.००, दक्षिण बाजू मी. १६.७५, पश्चिम बाजू मी. १४.०० व उत्तर बाजू मी. १६.७५ आहे. यासी चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. २६, दक्षिणेस - प्लॉटनं २८, पश्चिमेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ३० व २५ आहे. याचे पाणी व वागणूक पश्चिम बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

**क)** याचा सर्व्हे नं. ४२४/१ब, याचा जुना गट नं. ९३६/५, याचा नविन गट नं. ९४२/५ यामधील बिनशेती प्लॉट नं. ३० याचे क्षेत्रफळ १८२.७५ चौ.मी. आहे. याचा बिनशेती आकार १२१ रु. ०० पैसे आहे. तसेच सदर क्षेत्रापैकी ६.७५ चौ.मी. क्षेत्र हे रोड बाधीत क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्र १७६.०० चौ.मी. आहे. याचे मोजमाप पूर्व बाजू मी. १२.५०, दक्षिण बाजू मी. १४.६२, पश्चिम बाजू मी. १२.५० व उत्तर बाजू मी. १४.०० आहे. यासी चतुःसिमा :- पूर्वेस - प्लॉट नं. २५, दक्षिणेस - प्लॉट नं. २९, पश्चिमेस - ६ मी. रुंदीचा रस्ता, उत्तरेस - ९ मी. रुंदीचा रस्ता आहे. याचे पाणी व वागणूक पश्चिम व उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे.

वर नमूद तीनही मिळकती या **१.** वर्षा नानासाहेब साखरे, रा. राजुरी, ता. करमाळा, **२.** बापूसाहेब भीमराव अंधारे, रा. माणकेश्वर, ता. भूम, **३.** शामनंदन नारायण फरताडे, रा. सटवाईवाडी, ता. वाशी, **४.** शुक्राचार्य किसन भोसले, रा. बेंबळे, ता. माढा, **५.** वर्षा पृथ्वीराज देशमुख, जान्हवी पृथ्वीराज देशमुख आणि राजवर्धन पृथ्वीराज देशमुख तिन्ही रा. वांगी नं. १, ता. करमाळा यांच्या मालकी कब्जे वहिवाटीच्या व ७/१२ हक्कपत्रकी नोंदलेली मिळकती आहेत. सदरील मिळकती त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढून त्या आमचे खरेदीदार अशिलांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलांकडून इसाराची रक्कम स्विकारल्या आहेत. सदरहू मिळकती या निर्वेध, निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिलेली आहे.

याउपर नमूद मिळकतींबाबत कोणाचे काही साठेखत, गहाणखत, वारसा हक्क, वहिवाटीचा हक्क, नजरगहाण, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचे हस्तांतराचे व्यवहार असलेस संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकती खालील पत्त्यावर द्याव्यात अन्यथा नमूद मिळकती या निर्वेध, निजोखमी व खरेदी योग्य आहेत असे समजून ठरले मुदतीत कायम खुषखरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मग मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.
तारीख : ०६/०८/२०२५.

**सही/-**
**श्री. विक्रम प्रभाकर जाधव, ॲडव्होकेट**
**८४०/१२०, व्हनकळस प्लॉट,**
**आलीपूर रोड, बार्शी, ता. बार्शी,**
**जि. सोलापूर. मो.नं. ९४२३८३७७७७**
**(अशिलांतर्फे ॲडव्होकेट)**

## मध्य रेल्वे
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने रेल्वेवरील ऑनलाइन ई-निविदा ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून आमंत्रित करत आहे. निविदा क्रमांक SUR/TD/T/2024/16R2. तारीख: 05/08/2025. कामाचे नाव: (1) SUR-AKOR कडून CPWI/DUD. (2) AKOR-DUD कडून CPWI/DUD. (3) CPWI/KLBG भाग-1 (DUD-HHD). (4) CPWI/KLBG भाग-2 (HHD-HQR). (5) CPWI/SDB (पुनर्निमंत्रण) अंतर्गत ट्रॅकवर सुरक्षा कुंपण (CB आणि निश्चित गाठ कुंपण) च्या तरतुदीशी संबंधित कामाचा विद्युत TRD भाग. अंदाजे किंमत: रु. 1,29,85,304.22. बयाणा रक्कम : रु. 2,14,900/-. पूर्ण कालावधी : 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 28/08/2025 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरडी), मध्य रेल्वे, सोलापूर**
AK/Sur-54
तुमच्या जनावरांना रेल्वे रुळांपासून दूर ठेवा

## खरेदीपुर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांना या खरेदीपुर्व जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या नीवन हद्दवाढ भगातील नेहरु नगर येथिल जुना सर्व्हे नं. ३५१/२ब यांसी नविन सर्व्हे नं. ७/२/ब यापैकी स्वामी विवेकानंद नगर भाग-२ या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं.३३ क यांसी क्षेत्र ३००० चौ. फुट इतकी आहे. यांसी **चतुःसिमा :-** पुर्वेस - गटाची उर्वरीत जागा, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नं.३४/१, ३४/२, उत्तरेस - प्लॉट नं.३२/१,३२/२ तसेच प्लॉट नं.५० ड यांसी क्षेत्र. २५०० चौ. फुट इतकी आहे. यांसी **चतुःसिमा :-** पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - सिध्दीविनायक नगर, दक्षिणेस - प्लॉट नं.५०, उत्तरेस - प्लॉट नं.४९ तसेच प्लॉट नं.२२ ब यांसी क्षेत्र १५०० चौ. फुट इतकी आहे. यांसी **चतुःसिमा :-** पुर्वेस - प्लॉट नं. २०/१, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. १४३ व कोळी यांचे घर.

वर नमुद केलेल्या प्लॉटजागा या जीवन शिवा लमाण यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविलेले असून इसारापोटी रक्कम स्विकारुन सदरच्या मिळकती या निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचाही, कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, कुलमुखत्यार पत्र, भाडे, लिव्ह ॲन्ड लायसन्स, बक्षीस, इसारापावती, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती (right of intrest) व इतर कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी, कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची मिळकत हि संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.

तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. ही खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली. दि. ०५/०८/२०२५

**सही/-**
**विश्वनाथ एम. मगी**
**(बी.एस.एल., एलएल.बी.) ॲडव्होकेट**
**पत्ता - युनिटी ड्रीम अपार्टमेंट प्रेम नगर,**
**विजापूर रोड, जुळे सोलापूर- ४१३००४**
**मो.नं. ९८९०५४३९२९**

**दैनिक सोलापूर तरूण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!**

विद्या विकास प्रतिष्ठान,सोलापूर
**व्ही व्ही पी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर.**
NAAC Accredited & ISO 9001:2015 Certified
७२/२ब, सोरेगांव, डोणगांव रोड, सोलापूर - ४१३००८ मो. 8380030555
Approved By AICTE, DTE, Mumbai & Affiliated to DBATU, Lonere.

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६**

| कोर्सचे नाव | Intake | Choice Code |
|---|---|---|
| आर्टिफिशियल इंटिलीजेन्स् ॲन्ड डाटा सायन्स | 60 | 632199510 |
| कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरींग | 120 | 632124210 |
| सिव्हील इंजिनिअरींग | 30 | 632119110 |
| इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | 60 | 632129310 |
| इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | 60 | 632137210 |
| मेकॅनिकल इंजिनिअरींग | 30 | 632121210 |

राष्ट्रीय स्तरावरील NAAC मानंकन प्राप्त असलेली संस्था
**DTE CODE EN-06321**
● प्रथम वर्ष CAP ROUND-1 करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख दि. ०५/०८/२०२५ ते ०७/०८/२०२५
● DIRECT SCEOND YEAR (DSE) CAP ROUND-2 करिता ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरण्याची तारीख दि. १०/०८/२०२५ ते १२/०८/२०२५
" Think Placement Think VVP"

Dr. Arun N. Gaikwad — CAMPUS DIRECTOR & PRINCIPAL | Hon. Dr. G. K. Deshmukh — FOUNDER CHAIRMAN | Hon. Shri. Amol (Nana) Chavan — PRESIDENT

✻ प्रवेशासाठी संपर्क ✻
प्रा. राजेंद्र सु. चव्हाण 9822174477
प्रा. जितेश के. रोमन 9545935455
टिपः व्ही.व्ही.पी. सुविधा केंद्र रविवार व सुट्टीच्या दिवशी सुरु राहतील.






सोलापूर : शहरात कौलारूंची घरे संपत गेली व सिमेंट कॉंक्रीटची घरे मोठ्या प्रमाणात उभारली तर पूर्वीच्या अरुंद रस्त्यांचे रुपांतर चार पदरी रस्त्यांमध्ये झाले. काही महिन्यात दोन उड्डाणपूल झाल्यानंतर शहराच्या सौंदर्यात आणखी भर पडेल. (छाया : केवल



बार्शी : दैनिक तरुण भारतच्या वर्धापनदिनाचा अंक पाहताना बार्शीचे आमदार दिलीपराव सोपल. यावेळी त्यांच्या समवेत बार्शीचे प्रतिनिधी अरुण बळप, संतोष सूर्यवंशी व इतर मंडळी.


# श्रीक्षेत्र हवा मल्लिनाथ पत्रिबन देवस्थान येथे विश्वातील एकमेव स्वयं बेलाचे पवित्र स्थान

श्रावणातील शिवदर्शन

**पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या सरहद्दीवरील सर्व धर्मीय श्रद्धास्थान श्री क्षेत्र जागृत श्रीमंतलिंग हवा मल्लीनाथ महाराज पत्रिबन देवस्थान किणी हे विश्वातील एकमेव स्वयं बेलाची पवित्र स्थान आहे. येथील बेलाची झाडांमुळे येथे सुहासिक, सुगंधी स्वच्छ निसर्गमय वातावरण असल्याने येथे भगवान शिव शंकराची वास्तव्य असल्याची अख्यायिका आहे.म्हणून येथे कोणीही आल्यास त्यांचा तात्काळ तणावमुक्त व टेन्शनमुक्त होतो. श्रावण महिना,नवरात्र दसरा आणि महाशिवरात्रीला येथे मोठी गर्दी असते.**

हजारो वर्षापूर्वी पासून येथे शेकडो स्वयं बेलाची पानाची झाडे आहेत. बेलाची पवित्र स्थानी हजारो ऋषीमुनी तपश्चर्या केले असून पूर्वी होटगी मठाचे मठाधिपती लिंगैक्य ष.ब्र. विरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी यांनी येथे अनुष्ठान व तपश्चर्या केलेचे आठवण जनतेत आहे. कर्नाटक महाराष्ट्रातील अनेक साधु-संतांनी आजही या ठिकाणी

तपश्चर्यासाठी येऊन आपली मनोकामना पूर्ण करून घेतात. येथील बेलांची वृक्षाचा स्थानाला कन्नड मध्ये पत्रिबन असे संबोधले जातत. येथील बेलाची पानाच्या झाडाप्रमाणे अख्या विश्वात कोठेही आढळत नाहीत. एका बेलाच्या पानाला तीन, पाच, सात आणि नऊ पान आहेत. या बेलाची झाडाची लागवण इतरत्र केल्यास वापत नाहीत. या दीड दोन एकरमध्ये बेलाची मुळे तुटले की तिथे एक बेलाची झाड तयार




होती. या बाबत अनेक कृषी तज्ञ, शास्त्रज्ञ आदी जण अन्य ठिकाणी या झाडांची फळे आणि बियाणे लावले परंतु वापली नाहीत. या ठिकाणी अर्धांगवायु झालेला रुग्णास येथे आणल्यास पूर्णपणे बरा होतो. येथून वर्षातून शे पाचशे अर्धांगवायु रुग्ण बरे होऊन जात आहेत. श्रावण महिन्यात येथे या पंचक्रोशीतील शाळेची विद्यार्थांना शिक्षकांनी सहलीसाठी आवर्जून घेऊन येतात. अक्कलकोट पासून २१ कि.मी. आणि नळदुर्ग पासून फक्त १६ कि.मी. अंतरावर बोरी नदीच्या काठावर वसलेले एकमेव जागृत शिवा शंकराची पत्रिबन देवस्थान आहे. तीनशे वर्षांपूर्वी एका ऋषीमुनींनी या ठिकाणी जिवंत समाधी घेतली आहे. समाधी घेतलेल्या ठिकाणीच्या खाली सोन्याची राजवाडा असल्याची अख्यायिका आहे. या जिवंत समाधीवर एक हेमांडपती कोरीव दगड आहे. या हेमाडपंती दगडावर सूर्य, चंद्र, शिवलिंग आदी कोरलेले शिलालेख आहेत. येथे सात आठ फूट उंचीचे एक वारूळ होते. या वारुळ खाली सोन्याचा राजवाडा आहे.या मुळे कीणी या गावास भंगार (सोनेचा) कीणी म्हणून ओळखले जात आहे. कन्नडमध्ये भंगार ला सोनं म्हणतात.या सोन्याचा राजवाड्यांच्या संरक्षणासाठी एक भला मोठा नागराज वास्तव्यास होते. सन १९९६ पूर्वी या भला मोठा नागराजच्या भीतीने सहसा या ठिकाणी कोणी फिरकत नव्हते. पण सण उत्सव दिवशी अनेकांनी भीत लांबुनच नवैद्य दाखवून पळून जात होते. सन १९९७ मध्ये श्रावण महिन्यात जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ओम हवा मल्लिनाथ महाराजांनी येथे अचानक रात्री १२ वाजता येवून या भल्या मोठे सात आठ फुटाचे वारुळ वर उभे राहिले आणि या वारुळ वर हात फिरविले. लगेच दुसऱ्या दिवसापासून हे वारुळ हळू हळू खाली उतरून जमीन लेवल झाले. तेव्हा पासून येथील भीती नाहीशी झाली. यानंतर शनिवार दि. ११ ऑक्टोबर १९९७ रोजी दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर राष्ट्रीय संत सदगुरु श्री ओम हवा मल्लिनाथ महाराजानी या ठिकाणी (भंगार) श्रीमंत लिंगांची स्थापना केली.

तेव्हा पासून दर वर्षी येथे श्रावण सोमावारी व नवरात्र दसराला विशेष गर्दी असते.

**- बसवराज बिराजदार, अक्कलकोट**
**७३८५३४६१८५**




## वीर कोतवाल शिक्षण संस्थेतर्फे शनिवारी गुणवंतांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

वीर कोतवाल शिक्षण संस्थेच्या वतीने नाभिक समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी १२ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिर जवळ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष गणेश दळवी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इयत्ता दहावी व बारावी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधून सोलापूर जिल्ह्यातील प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक अनुक्रमे ३००१, २५०१, १५०१ रोख असे एकूण बारा बक्षिसे आणि सन्मान चिन्ह देऊन विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार आहे. पदवी आणि पदवीत्तर मध्ये आणि विविध खेळांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाज बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष गणेश दळवी यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस पांडुरंग चौधरी, सिद्धेश्वर आगाशे, डॉ. गणपती वाघमोडे, विजयकुमार माने आदी उपस्थित होते.












## महत्वाचे...



### प्रा. दुर्गा जोशी यांना राज्य समृद्धी संस्कृत अध्यापन प्रेरणा पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

संस्कृत अध्यापन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सोलापूरच्या प्राध्यापिका गंगाधर जोशी यांना काल कोल्हापूर येथे संपन्न झालेल्या समृद्धी सांस्कृतिक व साहित्य ट्रस्ट मुंबईच्या वतीने अभिनेत्री मीनाक्षी पाखरे, गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष आणि आमदार मिणचेकर , महेश पाखरे, ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार सरकार इंगळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यानिमित्त घेण्यात आलेल्या काव्य संमेलनात सुद्धा दुर्गा जोशी यांना सन्मानित करण्यात आले. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ, शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते. यापूर्वीही दुर्गा जोशी यांना अनेक राज्यस्तरीय जिल्हास्तरीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत.



### प्रकाश महामुनी यांना राज्य साहित्य विकासरत्न प्रेरणा पुरस्कार प्रदान

**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

बार्शी येथील ज्येष्ठ साहित्यिक तथा भारत संचार निगम लिमिटेडचे निवृत्त उपमहाप्रबंधक श्री प्रकाश महामुनी यांना समृद्धी पर्यटन,सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्ट मुंबई या संस्थेच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय साहित्य विकासरत्न प्रेरणा पुरस्कार करवीर वाचन मंदिर, कोल्हापूर येथे आयोजित सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र,प्रशस्तीपत्र, आणि सन्मान चिन्ह असे आहे.आत्तापर्यंत श्री प्रकाश महामुनी यांना साहित्य क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानामुळे तसेच सामाजिक क्षेत्रातील योगदानामुळे साहित्य भूषण,समाज गौरव,समाज रत्न,इत्यादी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.राज्यस्तरीय साहित्यरत्न प्रेरणा पुरस्काराने गौरवण्यात आल्याबद्दल सोनार समाज सेवा संस्था तसेच विविध स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत आहे .



### मल्लिकार्जुन मंदिरात पालखी मिरवणूक

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

श्री मल्लिकार्जुन मंदिरात पालखी व वाजंत्री सह पाच प्रदक्षिणा घालण्यास सुरुवात करण्यात आली. पालखी मिरवणुकीस शेकडो भक्तजन महिला सह उपस्थित होते. श्री मल्लिकार्जुन मंदिर पाच फेरी झाल्यानंतर महाआरती करून प्रसाद वाटप करण्यात आले. याप्रसंगी श्री सिद्धेश्वर नंदीध्वज प्रमुख मानकरी श्री राजशेकर हिरेहब्बू, सागर हिरेहब्बू, सुरज हिरेहब्बू, विकास हिरेहब्बू, प्रथमेश हिरेहब्बू, संतोष हिरेहब्बू, जगदीश हिरेहब्बू, धनेश हिरेहब्बू, विनोद हिरेहब्बू, यश हिरेहब्बू, ओमकार हिरेहब्बू, राजू स्वामी, निलप्पा वाले, बसवराज स्वामी, जयप्रकाश आमणगी, बाळासाहेब दर्गोपाटील, प्रकाश पटणे, बसवराज उळागडे, ॲड. सुरेश तिवाडी, सुभाष सरसंबी, अशोक म्हेत्रे, गुरुनाथ कुदळे, गुरांना निम्बर्गी, नागनाथ आवजे, नागराज उनंकी, ईरप्पा वस्त्रद, संजय भैरवपाटील, ओमकार पाटील, गंगाधर कुडल, योगीराज भोगडे, सुरज निमफोडे, संजय साबणे, राजशेकर म्हेत्रे, संतोषकुमार बोराडे, करंबसप्पा चिंचसुरे, राजकुमार टाकळे, पुष्पक देशमाने, कुबेर जन्मा, विश्वजीत कारंडे, सीमा देवकते, मंजुषा मुंडके उपस्थित होते.



### माधव हिंगमिरे व रेहान शेख विजेते; बार्शी तालुका बॅडमिंटन स्पर्धा

**बार्शी, दि.५ ऑगस्ट-**

बार्शी तालुका बॅडमिंटन स्पर्धेत माधव हिंगमिरे व रेहान शेख यांनी विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी सीए अतुल गुंडेवार व हर्षद मोरे यांचा पराभव केला. बार्शी तालुका बॅडमिंटन असोसिएशनच्यावतीने डॉ. प्रकाश बुरगुटे यांच्या वाढदिवसानिमित्त राहुल तिवारी ॲकॅडमी शिवशक्ती ग्राउंड कॅम्पस येथे ही स्पर्धा पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन डॉ. विलास देशमुख, डॉ. विक्रांत शहा, बाळासाहेब आडके, सुनील शेटे, शशिकांत गोदने, अनिल बंडेवार, टिल्लू शेठ जाजू यांच्या उपस्थितीत झाले. या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सारंगा बुरगुटे, डॉ. अवध, विशाल अग्रवाल, जुनेद बग्गा, सागर नाळगे, बी.टी.बी.ए अध्यक्ष विशाल रगडे-देशमुख व राहुल मोंटी तिवारी यांचे विशेष योगदान राहिले. या स्पर्धेत बार्शी, वैराग, पानगाव आदी परिसरातील खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंदात सहभाग घेतला.

# पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की

## शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने वीर फकिराच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती सांगता मिरवणुकीत पोलिस निरीक्षकांनी मंडळ पुढे घेण्यास सांगितले, मंडळ पुढे न घेता पदाधिकारी रस्त्यावर झोपले, इतर मंडळांना जाण्यासाठी अडथळा निर्माण करीत पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना धक्काबुक्की ढकलून दिले यावरून शासकीय कामात अडथळा निमाण केला. हा सर्व प्रकार कल्पना टॉकीज कॉर्नर आणि भैय्या चौक याठिकाणी घडला असल्याने याप्रकरणी वीर फकिरा तरूण मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व आधारस्तंभावर ही फौजदार चावडी पोलिसांत सोमवारी रात्री साडे अकराच्या सुमारास गुन्हा दाखल केला आहे.

वीर फकिरा तरुण मंडळाचे अध्यक्ष अतिश धडे, उपाध्यक्ष प्रेम जाधव, सचिव ओंकार डोलारे, खजिनदार अनिकेत बागडे, आधारस्तंभ सौदागर क्षीरसागर (सर्व रा. सोलापूर) व इतर चार ते पाच पदाधिकारी अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्याचे सहा फौजदार शेख यांनी फिर्याद दिली आहे.

शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती सांगता मिरवणूक काढण्यात आली,त्या मिरवणुकीमध्ये वीर फकिरा तरूण मंडळ सोलापूर हे मंडळ सहभागी झाले होते. पोलिस प्रशासनाकडून घालून दिलेल्या आवाजाच्या मर्यादेपेक्षा जास्तीचा आवाज वीर फकिरा तरुण मंडळाचा येत होता. या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी साऊंड सिस्टिममध्ये हिंदी व मराठी गाण्याचा आवाज जास्त ठेवून डीजेचा वापर केला. डीजेच्या आवाजामुळे त्या परिसरातील लोकांचा जीवितास धोका निर्माण झाला, त्याच्या मंडळाचा आवाज १००.६ एलएईक्यू असे तीव्रतेपेक्षा जास्त होता. पर्यावरण संरक्षणाच्या नियमाचे उल्लंघन केले. तसेच पोलिस निरीक्षक बंडगर यांनी वीर फकिरा तरुण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना तुमच्या मुळे इतर मंडळांना पुढे जाता येत नाही. तुमचे मंडळ पुढे घ्या असे समजावून सांगितले. मात्र मंडळाचे आधारस्तंभ सौदागर क्षीरसागर यांनी आम्ही पुढे जाणार नाही,तुम्हाला काय करायचे आहे ते करा. असे म्हणून मंडळातील देखाव्याच्या ट्रॅक्टर समोर रस्त्यावर आडवा झोपले व इतर पदाधिकार-कार्यकर्ते मांडी घालून बसून इतर मंडळांना पुढे जाण्यासाठी अडथळा निर्माण केला. पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, सहायक फौजदार शेख, पोलिस हवालदार जाधव व देडे यांना धक्काबुक्की करून मागे ढकलून शासकीय कामात अडथळा आणला आहे. यावरून अध्यक्ष व उपाध्यक्षासह एकुण दहा जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक राधिका जेऊघाले या करीत आहेत.

# विडी घरकुलमधील सराईत गुन्हेगारांची टोळी तडीपार






**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

जुना विडी घरकुल परिसरात गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीस पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या आदेशान्वये सोलापूर व धाराशिव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले.

गणेश नागनाथ भोसले (वय २८, रा. प्रियदर्शनी नगर, विडी घरकुल, सोलापूर), ईश्वर उर्फ रौनी भालेनाथ चौगुले (वय २५, रा. रविवार पेठ, जोशी गल्ली, सोलापूर), नारायण उर्फ बबलू नागनाथ भोसले (वय ३२, रा. प्रियदर्शनी नगर, जुना विडी घरकुल, सोलापूर), सद्दाम शबीर शेख (वय २७, रा. भारत नगर, जुने विडी घरकुल, सोलापूर) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. वरील चौघां सराईत गुन्हेगारांविरुध्द सन २०१९, २०२०, २०२३ व २०२५ या कालावधीत टोळीच्या माध्यमातून दुखापत करणे, दंगा करणे, ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या गुन्हेगारी कारवायांना आळा घालण्यासाठी एमआयडीसी पोलिसांकडून चौघांना तडीपार करण्याचा प्रस्ताव पोलिस उपायुक्त कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास पोलिस उपायुक्त कबाडे यांनी मान्यता देत चौघांनाही सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर चौघांनाही विजापूर (कर्नाटक) येथे सोडण्यात आले आहे.

### मिल्लत मशिदजवळून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

सोलापूर - शहरातील मिल्लत मशिदजवळून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.

याबाबत मोहम्मद इसाक अ. सलीम धुत्तरगी (वय ३०, रा. नई जिंदगी, विजयलक्ष्मी नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहम्मद धुत्तरगी यांनी त्यांची एमएच ४५ के ५०६७ क्रमांकाची दुचाकी ही १६ जुलै रोजी दुपारी मिल्लत मशिदशेतारी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार धुमाळ पुढील तपास करीत आहेत.

### पोलिस प्रशासनाच्या आदेशाविरुध्द वाहने उभा करून मिरवणुकीत अडथळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

मिरवणुकीत पोलिस प्रशासनाकडून प्रत्येक मंडळास रस्त्याच्या उजव्या बाजूने येण्यास सांगितले होते, मात्र एका मंडळाने पोलिसांच्या आदेशाचे पालन न करता डाव्या बाजूने येवून मिरवणुकीत व सार्वजनिक रस्त्यात अडथळा निर्माण केला, यावरून एस. एस. मागासवर्गीय सामाजिक संस्थेच्या ओंकार मस्के (रा. सोलापूर) यांच्यावर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत पोलिस अंमलदार लवटे यांनी फिर्याद दिल्याने सोमवारी पावणे बाराच्या सुमारास गुन्हा नोंद झाला आहे.




एस.एस. मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्था या मंडळास रस्त्याच्या उजव्या बाजूने येण्याचा आदेश पोलिस प्रशासनाकडून दिला होता. त्या आदेशाचे पालन न करता डाव्या बाजूने येवून सार्वजनिक रस्त्यात अडथळा निर्माण केला, विना परवाना मंडळाची वाहने उभे करून वीर फकिरा तरुण मंडळ न्यू बुधवार पेठ या मंडळास पुढे जाण्यास प्रतिबंध केला,रस्ता अडवून मिरवणुकीमध्ये बाधा होईल असे कृत्य केले आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस नाईक चव्हाण हे करीत आहेत.

### छाया उंब्रजकर यांना राज्यस्तरीय ज्ञानविद्या विकासरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**



लेखिका छाया उंब्रजकर यांना समृद्धी पर्यटन, सांस्कृतिक विकास सेवा ट्रस्ट, मुंबई यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय ज्ञानविद्या विकासरत्न करवीर वाचन मंदीर, कोल्हापूर येथे आयोजित सन्मान सोहळ्यात प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप मानपत्र , प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह असे होते. त्यांच्या शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रातील योगदानाने आजपर्यंत बरेच पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहेत.

### स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांच्या रचनांवर स्वरप्रभा गायन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ५ ऑगस्ट-**

स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे यांच्या रचनांवर आधारित ७व्या आंतरराष्ट्रीय स्वरप्रभा गायन स्पर्धेचे गानवर्धन आणि स्वरमयी गुरुकुलतर्फे आयोजन करण्यात आले आहे. शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सुगमसंगीत अशा तीन विभागात स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १५ ते ३५ वयोगटासाठी ही स्पर्धा असून प्रवेश विनामूल्य आहे. शास्त्रीय गायन स्पर्धेसाठी १५ मिनिटांचा वेळ असून भिन्न लयीतील दोन बंदिशी किंवा एक बंदिश व तराणा सादर करायचा आहे. या स्पर्धेत प्रथम १५ हजार, द्वितीय ११ हजार आणि तृतीय ८ हजार रुपये असे पारितोषिक देण्यात येणार आहे. उपशास्त्रीय संगीतासाठी १० मिनिटांचा वेळ असून या स्पर्धेत प्रथम १० हजार, द्वितीय ७ हजार आणि तृतीय ५ हजार रुपये बक्षीस देण्यात येणार आहे. सुगम संगीत स्पर्धेसाठी ६ मिनिटांचा वेळ असून स्पर्धेत प्रथम ७ हजार, द्वितीय ५ हजार आणि तृतीय तीन हजार

### प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेबाबत कार्यक्रम पुढे ढकलला

#### लवकरच पुढील तारीख जाहीर करण्यात येणार : आयुक्त मीना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (ई. पी.एफ.ओ.) क्षेत्रीय कार्यालय सोलापूरमार्फत प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेबाबत नियोजित १ ऑगस्ट २०२५ रोजीचा जनजागृती कार्यक्रम प्रशासकीय कार्यक्रम तुर्तास पुढे ढकलण्यात आला आहे. लवकरच पुढील तारीख जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती सोलापूर क्षेत्रीय भविष्य निधी आयुक्त पुरुषोत्तम मीना यांनी दिली.

नव्याने सुरू झालेल्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेबाबत जागरुकता निर्माण आणि माहिती प्रसारित करणे, कर्मचारी आणि नियोक्ते दोघांनाही फायदा व्हावा हा या कार्यक्रमामागचा उद्देश आहे. सोलापूर आणि सोलापूरपासून दूर असलेल्या कर्मचारी आणि नियोक्त्यांच्या फायद्यासाठी हे कार्यक्रम प्रत्यक्ष बैठक आणि आभासी परिषदेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेचे उद्दिष्ट देशात नवीन रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देणे आहे. या योजनेचे दोन भाग आहेत. भाग अ मध्ये १ लाखापर्यंत वेतन असलेल्या नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना वेतनाचे थेट लाभ हस्तांतरण करून प्रोत्साहन देणे आहे. योजनेअंतर्गत दिले जाणारे जास्तीत जास्त प्रोत्साहन १५ हजाराच्या वैधानिक वेतन मर्यादेपर्यंत मर्यादित असेल. भाग ब मध्ये प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यासाठी दरमहा ३ हजार (नवीन निर्माण झालेल्या रोजगाराच्या वेतनावर अवलंबून) मर्यादेपर्यंत नियोक्त्यांना थेट लाभ हस्तांतरण प्रदान करण्याचे उद्दिष्ट आहे.

# रघुवीर रॉयल्स संघास विजेतेपद

#### आमदार उत्तमराव जानकर चषक टेनिस बॉल क्रिकेट

#### सोमनाथ भैस इलेव्हन पिलीव उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ५ ऑगस्ट-**

आमदार उत्तमराव जानकर चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत रघुवीर रॉयल्स संघाने विजेतेपद पटकाविले.

वेळापूर पालखी मैदानावर आमदार उत्तमराव जानकर यांच्या वाढदिवसानिमित्त डे-नाईट क्रिकेट स्पर्धा पार पडली. अंतिम सामन्यात रघुवीर रॉयल्स संघाने अष्टपैलू कामगिरी करत सोमनाथ भैस इलेव्हन पिलीव संघावर दणदणीत विजय मिळवला व १ लाख रुपये रोख व आकर्षक चषक पटकाविला. उपविजेत्या सोमनाथ भाई इलेव्हन पिलीव संघास ६१ हजार रुपये देण्यात आले.



बक्षीस वितरण आमदार उत्तमराव जानकर, माजी सभापती मच्छिंद्र ठवरे, तुकारामभाऊ देशमुख, तुकाराम ठवरे, उघडेवाडी माजी उपसरपंच तानाजी जगदाळे , मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, माजी पं. स. सदस्य अजय सकट, ओबीसी सेल ता. कार्याध्यक्ष साहील आतार, माजीउपसरपंच जावेद मुलाणी, संजय देशपांडे, रायचंद खाडे, जीवन जानकर, संदीप माने देशमुख, हनुमंत वायदंडे, धनंजय शिवपुजे, महावीर मुंगूस्कर, समाधान जानकर आदींच्या उपस्थितीत झाले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये योगदान दिलेल्या कार्यकर्त्यांचा यावेळी आमदार जानकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये अतुल माने देशमुख, दादासाहेब तुपे, जवान माने देशमुख, दीपक माने देशमुख, शिवाजी पनासे पाटील, वैभव बनसोडे, रोहन

#### पारितोषिक विजेते

**विजेता :** रघुवीर रॉयल्स
**उपविजेते :** सोमनाथ भैस इलेव्हन पिलीव
**तृतीय :** श्रीराम क्रिकेट क्लब (जांभूड).
**चतुर्थ :** श्री साई क्रिकेट संघ (श्रीपूर).
**मालिकावीर :** अविनाश पवार (१० हजार रोख)

# आ. देशमुखांसह आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांचा संयुक्त दौरा

#### हद्दवाढ भागातील विविध समस्या जाणून घेतल्या

#### तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

शहरातील नागरी समस्या जाणून घेण्यासाठी आमदार सुभाष देशमुख आणि सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी संयुक्तरित्या शहरातील हद्दवाढ भागातील विविध भागांची पाहणी केली. या दौऱ्यात त्यांनी पाटील नगर, सुंदरम नगर आणि आसरा चौक परिसरास भेट देऊन नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या. संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

प्रारंभी पाटील नगर भागात पाहणी दौरा करताना आमदार देशमुख आणि आयुक्त ओंबासे यांनी ड्रेनेज व्यवस्था आणि रस्त्यांची स्थिती याचा आढावा घेतला. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर साचलेल्या सांडपाण्यामुळे होणाऱ्या दुर्गंधी, मच्छरांचा त्रास आणि आरोग्याच्या समस्या याकडे लक्ष वेधले. त्यावर आमदार देशमुख यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना त्वरित कार्यवाही करण्याचे आदेश दिले. रस्त्यांचे लवकरात लवकर डांबरीकरण किंवा काँक्रीट रस्त्याचे काम हाती घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. यानंतर त्यांनी सुंदरम नगर भागातील नाट्यगृहासाठी प्रस्तावित असलेल्या जागेची पाहणी केली. या परिसरात सांस्कृतिक उपक्रमांची गरज लक्षात घेता भविष्यात आधुनिक नाट्यगृह उभारण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला. पुढे स्विमिंग पूल परिसराची पाहणी करताना त्यांनी पूलची सद्यस्थिती, देखभाल आणि सुविधा याचा आढावा घेतला.

यानंतर आसरा चौकात सध्या सुरू असलेल्या उड्डाणपुलाच्या कामाचीही त्यांनी पाहणी केली. कामाचा वेग आणि गुणवत्ता याचा आढावा घेत अधिकाऱ्यांना कामात गती देण्याच्या सूचना दिल्या. या संपूर्ण पाहणी दौऱ्यात महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते, विभागप्रमुख आणि संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.



#### महापालिका नागरिकांच्या सोयीसाठी कार्यरत : डॉ. ओम्बासे

महापालिका प्रशासन नागरिकांच्या सोयीसाठी सतत कार्यरत आहे. प्रत्यक्ष पाहणी करूनच योग्य निर्णय घेण्याचा आमचा उद्देश आहे. पुढील काही दिवसांत आपण शहराच्या इतर भागांमध्येही अशीच पाहणी करून आवश्यक उपाययोजना करू, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

#### प्रत्येक भागातील समस्या सोडवण्यासाठी आम्ही वचनबद्ध : आ. देशमुख

शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महापालिकेच्या सहकार्याने प्रयत्न सुरू आहेत. जनतेच्या समस्या हेच आमचे प्राधान्य आहे. प्रत्येक भागातील समस्या समजून घेत त्या सोडवण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.




### वादातून पत्नीवर कोयत्याने हल्ला

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

पती पत्नीमधील घरगुती वाद विकोपाला गेल्याने पतीने पत्नीच्या डोकयावर कोयत्याने वार केले. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील हन्नूर कुडल संगम येथे घडला.

श्रीदेवी हनमंत खानापुरे (वय ४२) असे वार करण्यात आलेल्या पत्नीचे नाव आहे. मंगळवारी मध्यरात्री ३.३० च्या सुमारास श्रीदेवी आणि त्यांचे पती हनमंत यांच्यात घरगुती कारणातून वाद झाला. हा वाद विकोपाला गेला आणि पती हनमंत याने घरातील कोयत्याने श्रीदेवीच्या डोक्यावर आणि पाठीवर वार केले. यात डोक्याला आणि पाठीला जखम झाल्याने पहाटे ५.४० वाजता भाऊ अशोक याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.





## जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था नियमित नं. १ सोलापूर

र.नं.७२३४ फोन - २७२४५०२ नों.दि. ११/०५/१९३४

**वैशिष्टे**

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल १८ कोटी ७१ लाख | | बचत ठेवी ६ कोटी १५ लाख |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड ३ कोटी २६ लाख | | गुंतवणुक : १ कोटी ३२ लाख |
| सभासद कर्जे येणे २७ कोटी ६२ लाख | स्वभांडवली संस्था | ऑडीट वर्ग 'अ' |
| सुसज्य कार्यालय व सभासद विश्रामगृह | कर्ज व्याज दर ६ टक्के | लाभांष दर ४ टक्के |
| एनईएफटीची सोय | विमा योजना (कर्जास संरक्षण) | आयएसओ मानांकन |
| विविध सामाजीक उपक्रम | रक्तदान व आरोग्य शिबीर | सभासद गुणवंत पाल्य पुरस्कार |
| एसएमएस सेवा | दिनदर्शिका प्रकाशन तातडी कर्ज ४० हजार | कॅशलेस व्यवहार कर्ज मर्यादा ७ लाख |


डॉ. एस.पी. माने.
चेअरमन

डी.एल. देशपांडे
सचिव


एस.एन. कुंभार
व्हा. चेअरमन

**संचालक मंडळ**

| | | |
|---|---|---|
| व्ही.वी. पाटील | एस.आर. तांबोळी | एस.एस. कलशेट्टी |
| व्ही.एम. घेरडे | व्ही.व्ही. घोगरे | जी.एम. मारडकर |
| एस.डी. म्हमाणे | टी.ए. मुतवल्ली | एस.एच. राठोड |
| के.जी. लालबोंद्रे | व्ही.के. शिंदे | सी.ए. वाघमारे |
| आर.आर. घुले | सौ. एम.एस. शिंदे | श्रीमती एस.ई. राऊत |
| तज्ञ संचालक : एस.एन. देशमुख | | एन.बी. शिंदे |




जनसेवक
लोकनेते
कै.आमदार.बाबासाहेब तानवडे
कै. दत्ता (अण्णा) तानवडे

सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!


मा.आनंद तानवडे
माजी विरोधी पक्षनेता जिल्हा परिषद सोलापूर

* शुभेच्छुक *
युवा नेते,
मा. श्री.प्रविण तानवडे
मित्र परिवार, अ.कोट


मा. प्रवीण तानवडे
उद्योगपती



संस्थाध्यक्ष


मा.प्रा.प्रबुध्दचंद्र झपके

संस्थापक अध्यक्ष

कै.गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके

माजी अध्यक्षा

कै.शोभनतारा उर्फ बाईसाहेब झपके

तरुण भारत

दैनिक सोलापूर तरुण भारत
वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

**संस्थेचा शाखा विस्तार**

| | |
|---|---|
| सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज, सांगोला. | नाझरा विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज, नाझरा |
| सांगोला विद्यामंदिर तंत्र प्रशाला, सांगोला | नाझरा विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, नाझरा |
| सांगोला विद्यामंदिर प्राथमिक विद्यालय, सांगोला | कोळा विद्यामंदिर हायस्कूल व ज्यु. कॉलेज, कोळा |
| सांगोला विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, सांगोला | कोळा विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल, कोळा |
| बालक मंदिर, सांगोला | |

\- शुभेच्छुक -

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ,
सांगोला, जि. सोलापूर



आमचे मार्गदर्शक


मा.श्री.
सचिन (दादा) कल्याणशेट्टी
आमदार, अक्कलकोट विधान सभा



दै. तरुण भारत
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा


प्रदीप मल्लिनाथ पाटील
अध्यक्ष, भाजपा अक्कलकोट मध्य मंडल
मा.सरपंच, समर्थनगर



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

## आज वर्धापन दिन कार्यक्रम

लाखो वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या **दैनिक तरुण भारत**चा ४१ वा वर्धापन दिन साजरा होत असून **बुधवार, ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ ते ९ यावेळेत** सर्व वाचक, जाहिरातदार आणि सोलापूरकरांसाठी चहापान व शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. होटगी रोडवरील तरुण भारत कार्यालयाच्या पाठीमागील इंडिस्ट्रीयल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल येथे हा कार्यक्रम होणार आहे. सर्वांनी अगत्य यावे, असे आवाहन कार्यकारी संचालक दिलीप पेठे आणि मुख्य संपादक प्रशांत माने यांनी केले आहे.






जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!



शुभेच्छुक

एक हितचिंतक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# श्रीमद्भागवत कथा मुक्तीचा शाश्वत मार्ग : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ५ ऑगस्ट-**

श्रीमद्भागवत कथा ही अत्यंत पवित्र आणि मनोशुद्धी करणारी दिव्य परंपरा आहे. ही कथा मनुष्याच्या अंतःकरणाचे शुद्धीकरण करते आणि त्याला परमेश्वराच्या सान्निध्यात नेणारा एक साधनमार्ग उपलब्ध करुन देते. मात्र या कथेचे श्रवण केवळ औपचारिकतेपुरते न करता, तिच्या नियमांचे श्रद्धेने आणि निष्ठेने पालन केले तरच त्या श्रवणाचे फल मनाला आणि आत्म्याला लाभते. मुक्तीच्या द्वारांचे उघडण हे या पवित्र कथेच्या नियमबद्ध आचरणावरच अवलंबून असते, असे श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रावणमास प्रवचनमालेच्या अकराव्या दिवशी 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर निरुपण करताना स्पष्ट केले. श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करण्यापूर्वी विशिष्ट प्रकारची आध्यात्मिक तयारी आवश्यक असते. या तयारीसाठी अनुबंध चतुष्टय म्हणजे अधिकारी, विषय, प्रयोजन आणि संबंध या चार तत्त्वांचा विचार केला जातो. या तत्त्वांचे विवेचन करताना डॉ. जयवंत महाराज सांगतात की, कथेचा अधिकारी कोण असावा, तिचा केंद्रबिंदू काय असावा, आणि त्यामागचे प्रमुख उद्देश कोणते असावेत, हे आधी स्पष्ट असावे. प्रयोजन सांगताना, एक गौण प्रयोजन आणि दोन मुख्य प्रयोजनांचे सम्यक ज्ञान असणे आवश्यक आहे. नारदजी सनतकुमारांना विचारतात की, या भागवत कथेचे महात्म्य इतके व्यापक आहे की, तिच्या व्रताचरणाचे नेमके नियम कोणते असावेत हे समजणे महत्त्वाचे आहे. यावर उत्तर देताना सनतकुमार म्हणतात की, कथेचे व्रत हे नित्यस्वरुपाने स्वीकारले गेले पाहिजे. जीवनात कितीही प्रतिकूलता आली तरी त्या व्रतापासून डगमगू न देता, मनात प्रबळ श्रद्धा व दृढ संकल्प ठेवून, त्या व्रताचे यथायोग्य पालन व्हावे हीच खरी भावना असावी. कथा कोणत्या स्थळी करावी, याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले आहे. तीर्थक्षेत्र, मंदिरे, वनक्षेत्र किंवा स्वतःच्या घरातसुद्धा कथा होऊ शकते, पण स्थळ पवित्र, शांत आणि प्रशस्त असावे. कथेचा वक्ता विशिष्ट आध्यात्मिक गुणांनी युक्त असावा. त्याच्या जीवनात विरक्तता असावी, तो वैष्णव वृत्तीचा असावा. त्याचे वागणे संन्यासीवृत्तीचे असावे, वेदशास्त्राचा अभ्यास केलेला असावा, दृष्टांत सांगण्यात कुशल असावा आणि त्याच्या वाणीमध्ये ओज, सात्त्विकता आणि स्थैर्य असावे. वक्ता पंडीत असला तरी धर्माबाबत त्याची श्रद्धा अढळ असावी. त्याच्या वागण्यात दोष नसावेत. तो स्त्रीलंपट, पाखंडी अथवा संदेहवादी नसावा. कारण अशा वक्त्याच्या कथेला आध्यात्मिक परिणाम मिळत नाही आणि जसे वक्त्याचे शुद्ध आचरण आवश्यक आहे. तसेच श्रोत्यांच्या मनातही पूर्ण भक्तिभाव, सद्भावना आणि परमेश्वरचरणी शरणागती असावी. या कथेचे प्रभावी वर्णन करताना नारदजी पुढे म्हणतात, आज माझे जीवन धन्य झाले. कारण शुकाचार्य कथा सांगत असताना, प्रल्हाद टाळ वाजवत आहेत, राजा परीक्षित कथा श्रवण करत आहेत, उद्धव झांज वाजवत आहेत, नारद स्वतः वीणेवर भजन म्हणत आहेत, अर्जुन भक्तिपूर्ण चाली गात आहे, इंद्र मृदंगाचा नाद करीत आहे आणि सनतकुमार जयजयकार करत आहेत. अशी ही भक्तिभावाने ओतप्रोत भरलेली श्रीमद्भागवत कथा केवळ ज्ञानाचे नव्हे, तर मुक्तीच्या मार्गाचेही द्वार उघडणारी असते.


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १०

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : बुधवार | दिनविशेष - |
| दि. ६ ऑगस्ट २०२५ | प्रदोष |
| विक्रम संवत् २०८२ | विष्णू पवित्रारोषण |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. द्वादशी (१४.०८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मूळ (१२.५९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वैधृति (०७.१६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (१४.०८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ** : मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन** : स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क** : घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह** : हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या** : मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ** : व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु** : विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# तीन चोरांना अटक; सहा दुचाकी जप्त

## शहर गुन्हे शाखेची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने तिघां दुचाकी चोरांना अटक करून त्यांच्याकडून चोरीच्या ६ दुचाकी जप्त केल्या.

सैफन नुरुद्दीन बागवान (वय ३०, रा. ४१०, किसान नगर, अंबाबाई मंदिरा जवळ चौगुले यांचे घरात भाडयाने, सोलापूर), गणेश ज्ञानबा कांबळे (वय ३०, रा. तुळजाभवानी नगर, किसान संकुलचे शेजारी, जुना विडी घरकुल, सोलापूर) आणि गणेश मल्लीनाथ स्वामी (वय २०, रा. सर्वोदय नगर, मुळेगांव रोड, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

शहर गुन्हे शाखेच्या पथकास मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी तुळजापूर रोडवरील पसारे वस्तीकडे जाणारे रस्त्यावर चोरीच्या दुचाकीसह थांबलेल्या सैफन बागवान यास ताब्यात घेऊन तपासामध्ये त्याच्याकडून चोरीच्या तीन दुचाकी जप्त केल्या. या दुचाकींबाबत मंगळवेढा व जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. त्याचप्रमाणे चोरीची दुचाकी घेऊन अक्कलकोट रोडचे बाजुला असलेल्या तुळजाभवानी नगर, किसान नगर जवळील, मोकळ्या मैदानाचे आडोशाला थांबलेल्या गणेश कांबळे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे केलेल्या तपासामध्ये पोलिसांनी चोरीच्या दोन दुचाकी जप्त केल्या. या दुचाकींबाबत सलगर वस्ती व एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. तसेच नेताजी सुभाष चंद्र बोस बगीच्या समोरील सार्वजनिक रस्त्याचे चोरीची दुचाकी विकण्यासाठी आलेल्या गणेश स्वामी यास ताब्यात घेऊन त्याच्याकडील चोरीची दुचाकी जप्त केली. या दुचाकीबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. अशा प्रकारे शहर गुन्हे शाखेकडील पथकाने चोरीच्या १ लाख ५५ हजार रुपये किंमतीच्या ६ दुचाकी हस्तगत केल्या आहेत. सदरची कामगिरी पोलिस आयुक्त एम. राज कुमार, उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड, पोलीस अंमलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

# तडवळच्या ओंकार कारखान्याने ऊसबील दिले वेळेत



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ५ ऑगस्ट-**

## शेतकऱ्यांतून समाधान

अक्कलकोट तालुक्यातील अनेक साखर कारखानदारांनी गेल्या गळीत हंगामापासून शेतकऱ्यांचे ऊस बिल थकीत ठेऊन शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करीत असताना तडवळ येथील ओंकार साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांची सर्व ऊस बिले वेळेत दिल्याने शेकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान ओंकार साखर कारखाना चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कारखान्यात नियमित आणि वेळेत बिले अदा करून कारखानादारांसमोर आदर्श निर्माण केला आहे. यामुळे चालू गळीत हंगामात ओंकार साखर कारखान्याला ऊस देण्याचा शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. ऊस बिल मिळत नसल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जात आहे. परंतु याउलट तडवळ येथील ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बोत्रे पाटील यांनी योग्य नियोजन करून शेतकऱ्यांचे कष्टाचे व हक्कांचे पैसे वेळेवर दिल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यातून कौतुक होत आहे. याशिवाय कारखान्याचे चेअरमन बोत्रे-पाटील आणि जनरल मॅनेजर व्ही.एम.गायकवाड यांनी तोडणी वाहतुक ठेकेदार यांचीही बिले नियमित आणि वेळेवर दिले आहेत. तडवळ येथील ओंकार साखर कारखान्याने ऊस पुरवठा केलेल्या सर्व ऊस उत्पादक शेतकरी व वाहतूक, ठेकेदारांची बिले तसेच कारखाना अधिकारी व कर्मचाऱ्यांना न्याय देऊन विश्वास संपादन केला आहे. ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बोत्रे-पाटील यांच्या ताब्यात १२ साखर कारखाना कार्यरत आहे. या सर्व कारखान्यात व्यवस्थापनाने योग्य नियोजन केल्याने सर्वांची बिले देणे शक्य झाले आहे. यामुळेच ऊस उत्पादक शेतकरी व वाहतूक, ठेकेदारामध्ये समाधान व्यक्त होत आहे. याचाच फायदा येत्या गळीत हंगामात कारखान्याला नक्कीच होणार आहे.

# आजारी अवस्थेतील वृध्दाचा उपचारापूर्वी मृत्यू

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट -**

मागील आठ ते दहा दिवसांपासून आजारी अवस्थेत असलेल्या वृध्दाचा मृत्यू झाला. हा प्रकार मंगळवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.विजय राजाराम गायकवाड (वय ६५, रा. मनोहर नगर, सोलापूर) असे वृध्दाचे नाव आहे. विजय हे मागील आठ ते दहा दिवसांपासून आजारी होते. त्यांना मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास श्वास घेण्यास त्रास होऊन दम लागत होता. यामुळे सकाळी १०.५० वाजता पत्नी मंगल यांनी उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वी ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# छातीत दुखून उलटी होऊन तरुणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

छातीत दुखून उलटी झाल्याने उपचारास दाखल केलेल्या तरुणाचा मृत्यू झाला. ही प्रकार मंगळवारी मध्यरात्री २.३० च्या सुमारास उघडकीस आला. संगप्पा राम पंजूलोर (वय ३५, रा. साईनाथ नगर, नई जिंदगी, सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. संगप्पा यास मंगळवारच्या मध्यरात्री २.३० च्या सुमारास अचाकन छातील दुखून उलटी झाली. यानंतर त्याला पहाटे ४.४५ च्या सुमारास नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. सकाळी ६.३० च्या सुमारास त्याचा मृत्यू झाला.

# 'त्या' हॉस्पिटलची आरोग्य अधिकाऱ्यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

## दोन वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असल्याची तक्रार

सोलापूर : वेळेत उपचार न मिळाल्याने दोन वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असल्याची तक्रार पालकांनी केली होती. त्या तक्रारीवरून महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी चिरायू हॉस्पिटलमध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तक्रारीनुसार त्या ठिकाणी शहानिशा केली. भागवत थिएटर जवळील चिरायू हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केलेल्या दोन वर्षाच्या मुलाचा मृत्यू संबंधित दवाखान्यात वेळेत उपचार न झाल्याची तक्रार पालकांनी आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांच्याकडे केली. या तक्रारीनंतर आरोग्य अधिकारी डॉ. माने यांनी संबंधित हॉस्पिटलमध्ये आज प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. या हॉस्पिटल मधील विविध विभागांची माहिती घेतली. या ठिकाणी रुग्णांच्या भोवती संबंधित नातेवाईक तसेच या रुग्णालयात मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. आवश्यक ती व्हेंटिलेशनची सुविधा दिसून आली नाही. नियमानुसार आवश्यक ती दक्षता आणि काळजी या रुग्णालयात घेतली जात नसल्याचे प्राथमिक दृष्ट्या दिसून आल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी सांगितले. दरम्यान, या प्रकरणी दगावलेल्या मुलाचे पालक आणि चिरायू हॉस्पिटलचे संबंधित डॉक्टर यांची सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाही नियमानुसार करण्यात येणार असल्याचे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.

# दुचाकीच्या धडकेने वृध्दाचा मृत्यू

## दुचाकीस्वाराविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

संत तुकाराम चौकातून अशोक चौकाकडे जाणारा रस्ता ओलांडणाऱ्या ९२ वर्षाच्या वृध्दाचा दुचाकीस्वाराने जोरदार धडक दिल्याने गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इब्राहीम मौलासाब मुजावर (वय ९२, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) असे मरण पावलेल्या वृध्दाचे नाव आहे. याबाबत जावेद इब्राहीम मुजावर (वय ३१, रा. तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन स्वप्नील रामकृष्ण मादगुंडी (वय २५, रा. साखर पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४ ऑगस्ट रोजी दुपारी मयत इब्राहीम मुजावर हे स्टेट बँक ऑफ इंडियासमोर असलेल्या संत तुकाराम चौकातून अशोक चौकाकडे जाणारा रस्ता ओलांडत होते. त्यावेळी स्वप्नील मादगुंडी याने त्याच्या ताब्यातील एमएच १३ सीझेड ३३२८ क्रमांकाची दुचाकी ही भरधाव व निष्काळजीपणे चालवून इब्राहीम मुजावर यांना जोरदार धडक दिली. यामध्ये मुजावर यांच्या डोक्यास, पायास गंभीर मार लागून त्यांचा मृत्यू झाला. म्हणून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी दुचाकीचालकाविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

# तरसाच्या हल्ल्यात दोन शेळ्या दगावल्या

**मोडनिंब, दि. ५ ऑगस्ट-**

तुळशी (ता. माढा) येथे तरससदृश्य प्राण्यांच्या हल्ल्यात दोन शेळ्यांचा मृत्यू झाला तर एक शेळी गंभीर जखमी झाली आहे. येथील हनुमानवाडी परिसरात सागर मोहन नरळे यांची शेळ्या व वासरे शेतात मुक्त चरत होती. दुपारी दीडच्या सुमारास भेदरलेले वासरू व गंभीर अवस्थेत एक शेळी घराकडे परतली. सागर यांनी शेताकडे जात पाहिले असता, दोन शेळ्या मृत अवस्थेत आढळून आल्या. त्यांच्या शरीरावर वन्य प्राण्याने हल्ला केलेल्या गंभीर जखमा आढळल्या. घटनास्थळी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट दिली. तरस सदृश्य प्राण्याने हल्ला केला असावा, असे त्यांनी सांगितले. यावेळी शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली.

# वळसंगकर हॉस्पिटलच्या विरोधात मनिषा मानेंची कामगार न्यायालयात धाव, २२ ऑगस्ट रोजी सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

एस पी इंस्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्य या हॉस्पिटलने कामावरून काढून टाकल्याने त्याच्या विरोधात प्रशासकीय अधिकारी पदावर राहिलेल्या मनिषा माने मुसळे यांनी कामगार न्यायालयात धाव घेतली आहे. कोणताही आरोप व कुठलाही ठपका न ठेवता कामावरून काढून टाकले आहे. हे मनिषा माने यांना मान्य नाही,व कामगार कायद्यानुसार ग्राह्य नाही असे म्हणून कामगार न्यायालयात फिर्याद दिली आहे,त्यावर आता २२ ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे. अशी माहिती ॲड.बी टी जाधव यांनी दिली.

प्रसिध्द मेंदूविकार तज्ञ डॉ. शिरिष वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी कानशिलात बंदुकीतून गोळी झाडून आत्महत्या केली.त्यानंतर डॉ.अश्विन वळसंगकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हॉस्पिटलच्या प्रशासकीय अधिकारी मनिषा माने यांच्यावर गुन्हा दाखल झाला, पोलिसांनी त्यांना आटक केली. त्यानंतर उमा वळसंगकर यांच्या सहीने हॉस्पिटलमध्ये अंतर्गत व्यवस्थापनात बदल झाला आहे. तुमच्याविरुध्द कुठलेही आरोप न करता व कुठलाही ठपका न ठेवता तुमची प्रशासकीय आधिकारी ही सेवा १ मे २०२५ पासून समाप्त करण्यात येत असल्याचे पत्र दिले होते. दरम्यान मनिषा माने यांना जामीन मिळाला. त्यांनी प्रशासकीय अधिकारी असे असले तरी व्यवस्थापनाच्या अंतर्गत झालेल्या बदलामुळे सेवा समाप्त करणे हे कायद्याने ग्राह्य धरता येणार नाही. तसेच कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता कामावरून काढून टाकणे हे देखील चुकीचे आहे. तसेच हॉस्पिटलला कामगार कायद्यातील पीएफ ॲक्ट, किमान वेतन कायदा, औद्योगिक विवाद कायदा, इंडस्ट्रियल एम्पॉलमेंट स्टाँडींग ऑर्डर ॲक्ट, तसेच इतर कामगार कायद्यातील तरतुदी लागू आहेत.असे न्यायालयात दाखल फिर्यादीत म्हटले आहे.



# श्राविका महाविद्यालयात साठे जयंती व टिळक पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

उमाबाई श्राविका कनिष्ठ महाविद्यालय व साने गुरुजी कथामाला महाविद्यालयीन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. गणेश लेंगरे यांनी आण्णाभाऊ साठे तसेच लो. टिळक यांचे जीवन चरित्र उलगडून सांगितले तसेच हे दोन्ही महामानव समाजसुधारक, थोर साहित्यिक कसे होते, त्यांच्या आयुष्यात घडलेले महत्वाचे प्रसंग हे छोट्या छोट्या गोष्टीतून सांगितले.

आभार प्रा. अर्चना कानडे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. अविनाश मुळकूटकर यांनी केले. कार्यक्रमास प्रा. प्रतिभा कंगळे, प्रा. सोमनाथ राऊत, प्रा. ज्योती बांगर, प्रा. प्राजक्ता काळे, प्रा. कल्याणप्पा हायगोंडे उपस्थित होते.

# बार्शीत गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

बळेवाडी येथील शेतात बाभळीच्या झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार सोमवारी सकाळी उघडकीस आली. बळीराम बलभिम पोकळे (वय ५७) असे आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे. याबाबत राजेंद्र रामराव पोकळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बळीराम हे बळेवाडी येथे एकटेच राहत होते. त्यांची पत्नी व मुले पुण्यात राहतात. सोमवारी सकाळी आठच्या सुमारास बळीराम हे शेताकडे जाताना हातात पांढरी दोरी असल्याचे राजेंद्र पोकळे यांना दिसले. त्यामुळे हा प्रकार समोर आला.

# सिव्हील हॉस्पिटलमधून दुचाकी चोरीस

**सोलापूर** - सिव्हील हॉस्पीटलमधील ए ब्लॉकजवळून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत प्रमोद शिवकुमार चप्पळगे (रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रमोद चप्पळगे यांनी १ जुलै रोजी दुपारी सिव्हील हॉस्पीटलमधील ए ब्लॉकजवळ त्यांची एमएच १३ एपी २७१४ क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद सदर बझार पोलिसांकडे करण्यात आली आहे.

# प्रार्थनायोग मंडळातर्फे उद्यापासून व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थना योग मंडळाच्या वतीने प. पू. महातपस्वी श्री कुमारस्वामीजी यांच्या ११६ व्या जयंती महोत्सवानिमित्त दि. ७ ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान व्याख्यानमाला , ग्रंथ प्रकाशन जयंती महोत्सव आणि वार्षिक स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प. पू. महातपस्वी श्री कुमारस्वामीजी योग विहार, इंदिरानगर पोस्ट ऑफिस जवळ, विजापूर रोड, सोलापूर येथे हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी पहिले पुष्प ''भारतातील अद्भुत मंदिरे व त्यामागचे विज्ञान'' या विषयावर माजी डॉ. व्यंकटेश मेतन यांचे व्याख्यान होणार आहे. सोलापूर जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सुनिल पेंडसे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे. शुक्रवार दि. ८ ऑगस्ट रोजी ''मानवी जीवनाचे चैतन्य सात चक्रांचे महत्त्व'' या विषयावर नागेंद्र रेवणकर , शनिवारी डॉ. बी.बी. पुजारी यांचे महातपस्वी श्री कुमारस्वामीजींचे जीवन व कार्य यावर मार्गदर्शन होणार आहे. रविवार दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे. सोमवारी ११ ऑगस्ट रोजी बदलती परिस्थिती व आव्हाने या विषयावर योग गुरु शिवराज पाटील यांचे तर मंगळवारी १२ ऑगस्ट रोजी सुसंगती सदा घडो या विषयावर संत साहित्याचे अभ्यासक मनोज कुलकर्णी यांचे व्याख्यान होईल.

बुधवार दि. १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता संगीत रजनी हा कार्यक्रम होणार आहे. दरम्यान, शुक्रवार दि. १५ ऑगस्ट रोजी महोत्सवाचा प्रमुख कार्यक्रम पार पडणार आहे. यामध्ये राजेंद्र मायनाळ लिखित ''महातपस्वी श्री कुमारस्वामीजी जीवन व कार्य'' या ग्रंथाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशन होणार आहे. अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी तर माजी आमदार विश्वनाथ चाकोते यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस नीलकंठप्पा कोनापुरे, बाबासाहेब कुलकर्णी, नागनाथ चौगुले आदी उपस्थित होते.

# सावळेश्वर दर्गाजवळील अपघातात तिघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

सोलापूर पुणे महामार्गावरी सावळेश्वर दर्गाजवळ झालेल्या अपघातात तिघे जखमी झाले. हा प्रकार सोमवारी रात्री ७.३९ वाजता उघडकीस आला. लक्ष्मी गोविंद चव्हाण (वय २७), गोविंद भगवान चव्हाण (वय ४५) व आर्यन गोविंद चव्हाण (वय ४ वर्षे, सर्व रा. केगाव ता उ सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. सोमवारी रात्री ७.४० च्या सुमारास वरील तिघे हे सावळेश्वर दर्गाजवळ जखमी अवस्थेत आढळून आले. त्यांना रुग्णवाहिकेतून रात्री ८.३० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# इनरव्हील क्लब स्टारलेटच्या अध्यक्षपदी सोनिया चंकेश्वरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

इनरव्हील क्लब सोलापूर स्टारलेटच्या अध्यक्षपदी सोनिया चंकेश्वरा यांची निवड झाली. त्याचा पदग्रहण समारंभ ज्येष्ठ समाजसेविका चंद्रिका चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला. नूतन अध्यक्ष सौ.चंकेश्वरा यांनी पदाची सूत्रे स्वीकारली. तसेच सचिव पदी गंगा लोणी, खजिनदार आम्रपाली कोणापुरे, क्लब प्रोजेक्ट कॉर्डिनेटर काजल सिंदगी यांच्यासह अन्य कार्यकारिणी आणि पदाधिकारी यांनी शपथ घेतली. याप्रसंगी क्लबच्या माजी जिल्हाध्यक्ष रेखा माने, अनुराधा चंडक, स्मिता चाकोते यांच्यासह विविध क्लबच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन अर्चना आघाव आणि श्वेता पाटील यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

महत्वाचे...



## आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत मागे हटायचे नाही; मराठा समाजाचा निर्धार

**वैराग, दि. ५ ऑगस्ट-**

मराठा समाजाला सगेसोयऱ्यासह कायद्याद्वारे सरसकट ओबीसी आरक्षण मिळावे, या प्रमुख मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे-पाटील २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आमरण उपोषणास बसणार आहेत. या निर्णायक लढ्याला बार्शी तालुक्यातील तडवळे गावातून मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव सहभागी होणार आहेत. तालुक्यात गावोगावी घोंगडी बैठकींच्या माध्यमातून जोरदार तयारी सुरू आहे. तडवळे येथे झालेल्या घोंगडी बैठकीत आरक्षणाचा निर्णय होईपर्यंत मागे हटायचे नाही असा ठाम निर्धार मराठा समाजाने केला आहे. तडवळे हे गाव मराठा आरक्षणाच्या लढ्याच्या प्रत्येक टप्प्यावर अग्रेसर राहिले आहे. कँडल मार्च, धरणे आंदोलन, प्रतिमा दहन, निषेध मोर्चा, यज्ञ अशा विविध उपक्रमांमध्ये गावाने सक्रीय सहभाग नोंदवला. विशेषतः ऐतिहासिक ट्रॅक्टर मोर्चात सर्वाधिक ट्रॅक्टर तडवळे गावातीलच होते. घोंगडी बैठकीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी मा. सरपंच अमर लोखंडे, मा. सभापती युवराज बापू पाटील, डॉ. कपिल कोरके, आनंद काशीद, युवराज काटे, तसेच घोडके मामा उपस्थित होते. घोंगडी बैठकीचे सूत्रसंचालन बाळासाहेब आवारे यांनी केले तर आभार अमरसिंह लोखंडे यांनी मानले.

## जिल्हा सरकारी वकिल प्रदिपसिंग राजपूत यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**



सोलापूर जिल्हा न्यायालयातील जिल्हा सरकारी वकिल प्रदिपसिंग मोहनसिंग राजपूत यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठ यांच्याकडून (घटस्फोटाचे म्हणजेच विवाह विच्छेदनाचे होणारे परिणाम) या विषयावर संशोधनासाठी विदयावाचस्पति डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी प्रदान केली आहे. विद्यापीठात झालेल्या मौखीक सादरीकरणात ॲड. रजपूत यांनी संशोधनातील महत्त्वाचे निष्कर्ष मांडले आणि घटस्फोटामुळे घटस्फोटीत पती-पत्नी, घटस्फोटीतांचे मुलबाळे, घटस्फोटीतांचे माता-पिता आणि घटस्फोटीतांचे दोन्ही परिवार व समाजावर होणारे परिणाम, घटस्फोटाची कारणे, घटस्फोटापूर्वी आणि घटस्फोटानंतर येणा-या अडचणी, हिंदू विवाह कायदयामध्ये व इतर धर्माच्या कायद्यामध्ये सद्य परिस्थितीनुसार करावी लागणारी सुधारणा, घटस्फोट संबंधातील पिडीतांसाठी जलत गतीने न्याय मिळण्यासाठी कौटुंबिक न्यायालयामध्ये सध्याची असलेली परिस्थिती, घटस्फोटानंतर उद्भवणाऱ्या परिस्थितीमध्ये कोणत्या सोयी व सुधारणा होणे आवश्यक आहे, कौटुंबिक न्यायालयाच्या कायदयामध्ये घटस्फोटीतांना जलद गतीने न्याय होणेसाठी आवश्यक सुधारणा सुचविलेल्या आहेत. ॲड. राजपूत यांचे सदर विषयाचे संधोधन दयानंद विधी महाविदयालयाचे माजी प्राचार्य डॉ. यु. मंगापतीराव आणि सध्याचे प्रभारी प्राचार्य डॉ. सोनाली गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विदयापीठामध्ये अध्यक्ष म्हणून डॉ. वसंत कोरे तर, बाहय परिक्षक म्हणून कोल्हापूर येथील डॉ. एम. सी. शेख, दयानंद महाविदयालयाचे व्यवस्थापक डॉ. उबाळे, दयानंद महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. दामजी, प्राचार्य डॉ. क्षिरसागर, प्राचार्य डॉ. शिंदे उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपक्रमाचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक



**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी राबविलेले विविध उपक्रमाचे कौतुक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. राज्याचे महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कौतुक केले आहे. दिनांक २ व ३ ऑगष्ट रोजी नागपूर येथे राज्यातील जिल्हाधिकारी यांचे कॉन्फरन्स घेणेत आली. या बैठकीत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविलेले विविध उपक्रमाचे सादरीकरण करणेची संधी देणेत आली. राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांचे सह प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थी, शिक्षक तसेच शेतकरी यांचे बांधावर जाऊन मार्गदर्शन केले आहे. शासकीय जमिनी सुरक्षित राहणे साठी 'लॅन्ड बँक' नावाने नाविन्यपूर्ण योजना तयार केली आहे. या उपक्रमाचे कौतुक देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले आहे. सेवादूत उपक्रमाद्वारे त्यांनी शासकीय दाखले घरपोहोच देणेची व्यवस्था केली आहे.लोकांना घरपोहोच सेवा देणे साठी सेवादूत ॲप तयार केले आहे. एका क्लिकवर घरपोहोच दाखले देणेची व्यवस्था करणेत आलेली आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी आदर्श आचारसंहिता तयार करून दशसुत्री करून देणेत आली आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणा बरोबर संस्कार देखील चांगले प्रकारे होत आहेत.

## शुभराय मठात आज राहुल उपाध्ये यांचे प्रबोधन

**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

श्री शुभराय महाराज मठ येथे, आज, बुधवार, दि. ६ ऑगस्ट रोजी राहूल ऊपाध्ये यांचे रामायणातील राम आणि आजचे कलयुग (भाग १) या प्रबोधन मालिकेतील भाग १ संध्याकाळी ०५:३० ते ०६:३० या वेळात सादर होणार आहेत. सर्वांनी वेळेवर उपस्थिती रहावे आणि प्रबोधनाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन मठाचे श्रीमती शुभांगी बुवा यांनी केली आहे.

# कॉरिडॉर विरोधात आता महिलांची एंट्री

### कॉरिडॉरसाठी आतापर्यंत १८ बैठका संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात कॉरिडॉर होणार असून अनेक प्राथमिक बाबींची पूर्तता करण्यात आली आहे. स्पष्ट विरोध असूनही प्रशासन लोकांची भूमिका, तीव्र विरोध शासनास कळवत नसल्याने महिला, माता, भगिनी आता रस्त्यावर उतरणार आहेत.

कॉरिडॉरसाठी एकूण १८ बैठका शासकीय अधिकाऱ्यांनी घेतल्या. मात्र यातून तोडगा निघाला नाही तर उलट नागरिकांच्या विविध समस्या ऐकून गुंतागुंत वाढत आहे. यामुळे भूसंपादन अधिकारी संतोष कुमार देशमुख यांनी सांगितले की, कॉरिडॉर आराखड्यात बदल होऊ शकतात, दरम्यान अधिकाऱ्यांनी समस्या जाणल्या आहेत. मात्र तरीही कॉरिडॉर प्रकल्पावर ते ठाम आहेत. पण यातून काहीतरी सुवर्णमध्य काढण्यात यावा जास्त पाडापाडी किंवा नुकसान होऊ न देता कॉरिडॉर करावा अशी मागणी आता स्थानिक नागरिकांतून होत आहे. दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी येथील महादेवी हत्तीणीसाठी सारा गाव एकवटला असून तिला परत आणण्यासाठी आंदोलन केले जात आहे. मग आपल्या सर्वस्व असणाऱ्या जागा, दुकाने आणि घरे वाचविण्यासाठी का लढा देऊ नये ? असा सूर संभाव्य कॉरिडोर बाधित नागरिकांकडून आळविला जात आहे. त्यामुळेच या लढ्याची धार अधिक तीव्र करण्यासाठी संभाव्य कॉरिडॉर बाधित नागरिकांच्या घरातील महिला, माता,भगिनी यांच्याकडून लवकरच कॉरिडॉर विरोधात भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. मंदिर परिसरातील स्थानिक लोकांमध्ये कॉरिडॉरचे भय सातत्याने वाढत आहे, युवकांना काम नसल्याने हजारो शिक्षित युवक मंदिर परिसरा मध्ये प्रासादिक साहित्याचे किंवा ईतर लहान मोठे व्यवसाय करून जगत आहेत. पंढरपूर येथे कोणतीही मोठी इंडस्ट्री किंवा एमआयडीसी नाही. त्यामुळे हजारो




इंजिनिअर, उच्च शिक्षण घेतलेले युवक गाव सोडून पुणे, मुंबई, बेंगलोर, नागपूर अशा मोठ्या शहरात कायमस्वरूपी वास्तव्यास गेली आहेत. मागील गेल्या तीन वर्षांपासून कॉरिडॉर प्रकल्प गाजत असल्याने मंदिर परिसरातील जागा, जमीन खरेदी व्यवहार बंद झाले आहेत. यासाठी तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या कार्यालयात बैठक घेण्यात येणार असून मंदिर परिसरातील महिला, माता, भगिनी उपस्थित राहणार आहेत.

### कॉरिडॉर होऊन रस्ता मोठा व मोकळा झाला तर चेंगराचेंगरी होण्याची शक्यता जास्त

काही दिवसांपूर्वी जगन्नाथ पुरी येथे ५०० फुटी रोडवर चेंगराचेंगरी व बेंगळुरू स्टेडियम वरील चेंगराचेंगरी हे ताजी उदाहरणे आहेत. उलट आज मंदिर परिसरातील हरिदास वेस, कासार गल्ली,भांडे गल्ली,बडवे गल्ली,उत्पात पथ, मंडईचा बोळ, कवठेकर गल्ली असे पॅरेलल रोड, पर्यायी मार्ग उपलब्ध असल्याने आजवर चेंगराचेंगरी सारखी कोणतीही दुर्घटना मंदिर परिसर व महाद्वार, पश्चिमद्वार परिसरात घडली नाही असेही संभाव्य बाधीतांकडून सांगितले जात आहे.

## 'शिवरत्न'तर्फे १२ ऑगस्टला नोकरी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ५ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनानिमित्त अकलूज येथे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, ''ॲक्सीस बँक नोकरी मेळावा २०२५'' चे १२ ऑगस्ट रोजी शिवरत्न नॉलेज सिटी शंकरनगर-अकलूज येथे करण्यात आले आहे. हा मेळावा सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत होणार आहे.

या मेळाव्याच्या माध्यमातून बिझनेस डेव्हलपमेंट एक्झिक्युटिव्ह आणि सेल्स ऑफिसर या पदांसाठी तरुणांना संधी मिळणार आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधर उमेदवारांना या संधीसाठी अर्ज करता येणार आहे उमेदवारांची निवड ऑनलाइन टेस्ट च्या आधारे करण्यात येणार आहे. मेळाव्यासाठी उमेदवारांनी अद्ययावत रेझ्युमे, १०वी, १२ वी व पदवीच्या मार्कशीट्सच्या ३ झेरॉक्स प्रती, ओळखपत्रे (आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स) आणि ३





पासपोर्ट आकाराचे फोटो घेऊन यावे. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यास निवड प्रक्रियेत अडथळा येऊ शकतो, याची नोंद घेणे आवश्यक आहे. हा उपक्रम शिवरत्न इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, शंकरराव मोहिते महाविद्यालय,ग्रीनफिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड टेक्नॉलॉजी, विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग ॲण्ड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्युटआणि ॲक्सीस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला आहे. नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पैशाच्या कारणावरून चाकूने हल्ला

**सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यातील पाकणी ते शिवणी रस्त्यावर पैशाच्या कारणावरून एकावर चाकूने हल्ला करण्यात आला. हा हल्ला सोमवारी सायंकाळी सातच्या सुमारास झाला. दिलीप शिवाजी गुंड (वय ५८, रा. शिवणी ता उत्तर सोलापूर) असे हल्ला झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. दिलीप हे शिवणी ते पाकणी रस्त्यावर होते. त्यावेळी तेथे सचिन पवार याने पैशाच्या कारणातून त्यांच्यावर चाकूने हल्ला केला. यात हनुवटीजवळ जखम झाली तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने मुगला धर्मराज याने मंगळवारी रात्री १२.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसर सुशोभीकरणासाठी ५० लाखांचा निधी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

विजापूर रोडवरील मोतीबाग येथील श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर हे एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. याच मंदिराच्या सुशोभीकरण कामासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्याने प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून रेवणसिद्धेश्वर महाराज मंदिर परिसर सुशोभीकरण कामासाठी ५० लाखांचा निधी उपलब्ध झाला.

या सुशोभीकरण कामाचा शुभारंभ पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांच्या प्रमुख उपस्थितीत ईच्छा भगवंताची सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे सर्वेसर्वा मार्गदर्शक लक्ष्मण जाधव यांच्या अध्यक्षतेखाली शुभारंभ करण्यात आला.

याप्रसंगी माजी नगरसेवक श्रीनिवास कोंडी, सिद्धाराम चाकोते, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, मंदिराचे पुजारी सिद्धाराम शिंगारे, ज्येष्ठ नागरिक शिवराया बुक्कानुरे मामा, श्रीमंत सुरवसे, राहुल हत्ती, मल्लू जाधव, चंदू माने गवळी, संभाजी सुरवसे, बसवराज पाटील, प्रज्वल जाधव, संजू भडंगे, सोनू तळभंडारे, बसवराज आळंदीकर, अजय चव्हाण, यश माने, अभिषेक बिराजदार, अमर रबकवी, प्रकाश चव्हाण, वीरेश केंगार, अशोक बिराजदार राजू मारुती वनस्कर, शोभा गायकवाड उपस्थित होते. सूत्रसंचालन पल्लवी माने यांनी केले तर आभार आनंद मुस्तारे यांनी मानले.

# निवडणूक हरकतींवर विभागीय आयुक्तांकडे सुनावणी

### प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची लगबग सध्या सुरू झाली आहे. सोमवारी ओबीसी प्रवर्गाच्या २७ टक्के आरक्षणाचा मार्ग एकीकडे मोकळा झाला. त्यानंतर या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक तयारी करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने पुणे येथे सर्व जिल्हाधिकारी यांच्यासमवेत बैठक आयोजित करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी गटनिहाय प्रारूप प्रभाग रचना निश्चित करण्यात आली आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप आराखड्यावर दाखल करण्यात आलेल्या हरकतींवरही विभागीय आयुक्तांकडे सुनावणी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका घेण्याची लगभग सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक तयारीस वेग देण्यात आला आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीवर गेल्या साडेतीन वर्षांपासून प्रशासकीय राजवट सुरू आहे. १८ ऑगस्ट रोजी अंतिम प्रभाग रचना निश्चित झाल्यानंतर आरक्षण काढले जाणार आहे. त्यानंतर हरकती, सुनावणी पूर्ण होऊन ऑक्टोबर-नोव्हेबरमध्ये निवडणूक होण्याची शक्यता प्रभारी जिल्हाधिकारी जंगम यांनी व्यक्त केली.

## झाडाची फांदी तुटल्याने तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

झाडावर चढून शेंगा काढत असताना, अचानक झाडाची फांदी तुटल्याने खाली पडून तरुण जखमी झाला. ही घटना पंढरपूर तालुक्यातील उमरे येथे सोमवारी सायंकाळी ५.३.० वाजता घडली. मारुती नरहरी चोपडे (वय ३०) असे तरुणाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळच्या सुमारास मारुती हा शेतातील शेवग्याच्या झाडावर चढून शेंगा काढत होता. त्यावेळी अचानक तो ज्या फांदीवर थांबला होता, ती फांदी तुटली. यात खाली पडल्याने त्याच्या सर्वांगास मुकामार लागल्याने पंढरपूर येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून अशोक चोपडे याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## ओन्ली संस्थेतर्फे तृतीयपंथांना धान्य वाटप; आणणाभाऊ साठे जयंतीनिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि.५ ऑगस्ट-**

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त येथील ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने तृतीयपंथीयांना एक महिना पुरेल एवढे धान्य वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून गणेश काशीद, पुणे व कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन वायकुळे होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन नागनाथ सोनवणे यांनी केले. तृतीयपंथी किरण मस्तानी यांच्या सूचनेनुसार संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांनी एक महिना पुरेल एवढे धान्य देण्यात आले. याप्रसंगी प्रा. सचिन मस्के, अजय तिवारी, भरत जाधव, सायरा मुल्ला, राजश्री गवळी, किरण मस्तानी यांनी मनोगत मांडले. यावेळी राहुल वाणी, नागनाथ सोनवणे, सचिन मस्के, अजय तिवारी, भरत जाधव, मानकोजी ताकभाते, विजय भाडवळकर, सुनील नवले, सायरा मुल्ला, रेखा विधाते, रागिनी झेंडे, त्रिशाला मिसाळ, रेखा सरवदे, अलका हाडगे आदी उपस्थित होते. राहुल वाणी यांनी आभार मानले.



## नूमवि शाळेत रंगले श्रावणातील खेळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ ऑगस्ट-**

नू. म. वि.शिशु शाळेत श्रावण शुक्रवार निमित्त शाळेच्या सर्व माता-पालकांना निमंत्रित करण्यात आले होते.

माता पालक आणि शिक्षिका यांना श्रावणात खेळले जाणारे खेळ गाणी यांच्या सादरीकरणाचे नियोजन मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांनी केले होते. सर्व वर्गाच्या माता पालक आणि शिक्षिका यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी अर्चना कुलकर्णी यांनी सर्वांशी सुखी, आनंदी जीवनासाठी,समाधानी संसारासाठी स्त्रियांची भूमिका कशी असावी हे विविध उदाहरणातून सांगितले. महिलांच्या खेळ,नाच सादरीकरणाच्या कार्यक्रमाचे सासु सुनांचा संवाद कसा असतो आणि कसा असावा हे संवादातून अर्चना कुलकर्णी आणि सायली देशमुख यांनी निवेदनातून मांडला. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका रंजना काळे आणि सर्व शिक्षिका आणि शिक्षिकेतर वृंद, यांची होती. यावेळी बहुसंख्येने माता पालकांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन अलका ओक यांनी केले.

### नियोजन भवनात

# उद्या पर्यटन विकास कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभाग व सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने भावपूर्ण महाराष्ट्र उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा सर्वांगीण विकास, कृषि पर्यटन, इको-टुरिझम व साहसी पर्यटनाला चालना देण्यासाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत नियोजन भवन, सोलापूर येथे पार पडणार आहे, अशी माहिती विभागीय पर्यटन कार्यालयाच्या उपसंचालक शमा पवार यांनी दिली आहे.

या कार्यशाळेचा उद्देश पर्यटन क्षेत्रातील स्थानिक अर्थवृद्धी, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण व शासकीय योजनांचा लाभ यावर केंद्रित असून, पर्यटन धोरण २०२४ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर समन्वय व धोरणात्मक दिशा ठरविणे हेही महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या क्षेत्रात कार्यरत असलेल्या व्यावसायिक व अनुभवी व्यक्तींना विशेष आमंत्रण देण्यात आले आहे. इच्छुक व्यक्तींनी व संस्थांनी कार्यशाळेत सहभाग नोंदवावा. याविषयी अधिक माहितीसाठी ८०८००३५१३४ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**अपेक्षित सहभागी घटक**

ट्रेकर्स, गिर्यारोहक, पर्यटन मार्गदर्शक, होमस्टे/हॉस्पिटॅलिटी सेवा देणारे, ट्रॅव्हल्स ब्लॉगर्स व सोशल मीडिया मार्केटर्स, साहसी खेळ व इव्हेंट आयोजक, पर्यटन संस्था व स्थानिक उद्योजक, युवक, महिला बचत गट सदस्य व महिला उद्योजक

**कार्यशाळेतील मुख्य बाबी**

नवीन व अनभिज्ञ पर्यटन स्थळांचा विकास, साहसी व इको-टुरिझम संधी, पर्यटन व स्थानिक भागधारकांमध्ये समन्वय, शासकीय योजनांची माहिती (अनुदान, आई योजना, बिगरव्याजी अर्थसहाय्य), महिला व बचत गट आधारित पर्यटन उपक्रमांना चालना.

## दुचाकीला वाहनाची धडक; मजुराचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

बार्शी ते कुर्दुवाडी डांबरी रस्त्यावर खांडवी शिवारात एका दुर्दैवी अपघातात गवंडी काम करणाऱ्या इसमाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार रोजी सायंकाळी घडली.

प्रकाश मारुती डुकरे (वय ४७, रा. नाळे प्लॉट, बार्शी) असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. प्रकाश डुकरे हे गवंडी कामासाठी निमगाव (ता. माढा) येथे जात होते. नेहमीप्रमाणे ते त्यांच्या दुचाकीवरुन निमगाववरुन बार्शीकडे परतत असताना, सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दुचाकीला एका वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेची माहिती त्यांच्या बहिणीने फोनवरुन त्यांच्या भावाला, लखन गणपत धोत्रे (रा. वाणी प्लॉट, बार्शी) यांना दिली. कुटुंबीय ग्रामीण रुग्णालयात दाखल झाल्यानंतर डॉक्टरांनी प्रकाश डुकरे यांना मृत घोषित केले. त्यांच्या डोक्याला व पायाला गंभीर जखमा झाल्या होत्या. या प्रकरणी लखन धोत्रे यांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, संबंधित वाहन चालकाचा पोलीस शोध घेत आहेत.




## 'स्वेरी'च्या तीन विद्यार्थ्यांची 'अदानी सिमेंटस'मध्ये निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ ऑगस्ट-**

'अदानी सिमेंटस' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या निवड प्रक्रियेतून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग व एमबीए विभागातील तीन विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती संस्थापक व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

अंतिम फेरीतून स्वेरीच्या धनराज साहेबराव घाडगे, प्रशांत हरिदास गायकवाड व सुमित भीमराव जाधव या तीन विद्यार्थ्यांची निवड झाली. त्यांना प्रत्येकी वार्षिक सव्वा चार लाख इतके पॅकेज मिळाले आहे. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव प्रा. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून 'अदानी सिमेंटस' या कंपनीत निवड झालेल्या धनराज घाडगे, प्रशांत गायकवाड व सुमित जाधव यांचे अभिनंदन केले.





सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

• शुभेच्छुक •

एक हितचिंतक



दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



उमेश दशरथ जमादार
सिव्हील इंजिनिअरींग

शुभेच्छुक

दशरथ (बाबुराव) जमादार

महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बेडर समाज

रविंद्र सिद्राम कावळे





जाहिरात आपली, सन्मान महाराष्ट्राचा

सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



मा.अशोकसिंह देशमुख
युवा उद्योजक
मो.९७६६२७२४५५

मा.अजितसिंह देशमुख
कार्याध्यक्ष माढा विधानसभा राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस | मो.९९२२५९९५३६

मा.अभयसिंह देशमुख
जनरल मॅनेजर, रिलायन्स इंडस्ट्रीज पेट्रोलियम, मुंबई

बांधकाम क्षेत्रातील विश्वसनीय नाव
कनकंबा एंटरप्रायझेस
प्रो.अशोकसिंह अभयसिंह देशमुख

शुभेच्छुक
कनकंबा एंटरप्रायझेस,
करकंब, ता.पंढरपूर, जि.सोलापूर

अल्ट्राटेक सिमेंट, राजुरी स्टील, जेएसडब्ल्यू स्टीलचे अधिकृत डीलर, अल्ट्राटेक कंपनीचे AEC BLOCK, बायडिंग वायर, ED अँगल, G7 वायर, वॉटर -- लिक्वीड, द्राक्ष बागांचे सर्व प्रकारचे साहित्य,बांधकाम मटरिअल योग्य दरात मिळेल.



सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

कै.पंचप्पा कल्याणशेट्टी



विकासपुरुष
आ.सुभाषबापू देशमुख

सोलापूर जिल्ह्याचे लोकप्रिय नेते
आ.सचिनदादा कल्याणशेट्टी

युवा नेते
मा.मनीषभैय्या देशमुख

आधारस्तंभ
मा.रामप्पा चिवडशेट्टी(सावकार)

किंगमेकर
मा.मिलनदादा कल्याणशेट्टी

शुभेच्छुक बलवान गोतसुर्वे

जिल्हा सरचिटणीस भारतीय जनता पार्टी (अनु.जाती) सोलापूर जिल्हा (पूर्व)



40 YEARS LAXMI AUTOMOBILES

VIDA
Powered by Hero

VIDA EVOOTER

Introducing VX2
Badalte India ka Scooter



Removable Batteries

142 km IDC range

THE FUTURE OF MOBILITY.
WITH THE COMFORT YOU KNOW.


Authorised Dealer
LAXMI AUTOMOBILES
आपली शोरुम...आपली माणसं...

• Kalgounda Bhavan, 98, Murarji Peth, Solapur
• Jule Solapur, Near Bharti Vidyapeeth, Bjp. Rd.
• Patil Nagar, Industrial Estate, Hotgi Road

Cell : 7428480366



कर्मयोगी



कै.सुधाकरपंत परिचारक (मालक)

सोलापूर 'तरुण भारत'

वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा..!

जिल्ह्याचे आमदार

मार्गदर्शक



मा.आ.प्रशांतराव (मालक) परिचारक

मा.उमेशराव परिचारक (मालक)

पंढरपूर बेदाणा मर्चन्टस् असोसिएशन, पंढरपूर

मा.सचिन फडे (सचिव) | मा.सोमनाथ डोंबे (अध्यक्ष) | मा.मुकुंदराव मर्दा (उपाध्यक्ष)